# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०७/०८/२००९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०७/०८/२००९ रोजी सभा सुचना क्र. ०९ दि. ०१/०८/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ७) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| ८) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| ९) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| १०) | श्रीम. हेलन गोविंद | -- | सदस्य |
| ११) | श्री. याकुब कुरेशी | -- | सदस्य |
| १२) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| १३) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| १४) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| १५) | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | -- | सदस्य |
| १६) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**उपस्थित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. संभाजी पानपट्टे | -- | उपायुक्त, आरोग्य विभाग |
| २) | श्री. दादासाहेब आ. पाटील | -- | मुख्य लेखापरिक्षक |
| ३) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता, सार्व बांधकाम |
| ४) | श्री. उत्तरेश्वर लोंढे | -- | सहा. संचालक, नगररचना |
| ५) | श्री. दिपक खांबित | -- | कार्यकारी अभियंता, सार्व. बाधकाम विभाग |
| ६) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| ७) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |
| ८) | श्री. सुनिल यादव | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| ९) | श्री. संजय गोखले | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २ |
| १०) | श्री. गोविंद परब | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| ११) | श्री. सुदाम गोडसे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३ |
| १२) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| १३) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| १४) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| १५) | श्री. स्वप्नील सावंत | -- | विभाग प्रमुख, जाहिरात |
| १६) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| १७) | श्री. राजकुमार कांबळे | -- | सहा. आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |
| १८) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १९) | डॉ. चकोर | -- | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| २०) | श्री. दादासाहेब खेत्रे | -- | विभाग प्रमुख, जकात |
| २१) | सौ. सई वडके | -- | विधी अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| २२) | श्री. चंद्रकांत बोरसे | -- | विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग |
| २३) | श्री. एन. के. सोनार | -- | शिक्षण अधिकारी |
| २४) | श्रीम. सिमा मिश्रा | -- | सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग |
| २५) | श्री. नागेश ईरकर | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |
| २६) | श्री. दामोदर संख्ये | -- | विभाग प्रमुख, सुवर्ण जयंती |
| २७) | श्री. हंसराज मेश्राम | -- | उद्यान अधिक्षक |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. सुधीर राउत | -- | उप आयुक्त (मुख्यालय) |
| २) | श्री. श्रीकांत मोरे | -- | मुख्य लेखाधिकारी |
| ३) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ४) | श्री. अशोक बागेश्वर | -- | उपायुक्त (मु.) |
| ५) | श्री. ओमप्रकाश दिवटे | -- | उपायुक्त अतिक्रमण |
| ६) | श्री. अजित पाटील | -- | कर निर्धारक व संकलक |
| ७) | श्री. राजेंद्र मारकड | -- | सहा. नगररचनाकार |
| ८) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| ९) | श्री हेमंत पाटील | -- | चौकशी अधिकारी |
| १०) | श्री. बाबुराव वाघ | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| ११) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जकात अधिकारी |
| १२) | कु. चारुशिला खरपडे | -- | अधिक्षक, आस्थापना विभाग |

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करतो. सचिवांनी सभेला सुरूवात केली.

**नगरसचिव :**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०७/०८/२००९ रोजी सभा सुचना क्र. ०८ दि. २४/०७/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती. प्रकरण क्र. ४९, दि. १७/०२/२००९ व दि. २५/०२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपला दौरा कॅन्सल कसा झाला?

**मा. सभापती :-**

तिकडे काही बंडखोरांनी रस्ते बंद केले होते. तेव्हा पोलिसांची इन्फॉर्मेशन आली की, तुम्ही तिकडे येऊ नका.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, वृक्ष प्राधिकरणवाले गेले का?

**नगरसचिव :-**

होय गेले?

**अनिल सावंत :-**

त्यांच्याबरोबर कोण कोण ऑफीसर गेले?

**नगरसचिव :-**

श्री. मेश्राम आणि श्री. इरकर गेले.

**अनिल सावंत :-**

श्री. मेश्राम आणि इरकर दोघे गेले आणि कोण गेले?

**नगरसचिव :-**

श्री. पानपट्टे साहेब.

**अनिल सावंत :-**

श्री. पानपट्टे साहेब म्हणजे एकच डीएमसी आहेत ते सुद्धा गेले दुसरे डीएमसी कोण आहेत?

**नगरसचिव :-**

श्री. राऊत साहेब म्हणून आले आहेत.

**अनिल सावंत :-**

ते कधी आले?

**नगरसचिव :-**
काल आले.
**अनिल सावंत :-**
काल आले मग आज कुठे आहेत.
**जुबेर इनामदार :-**
सध्या वृक्षरोपणाचा कार्यक्रम करता येईल अशा वेळी म्हणजे पावसाच्या वेळी दोन्ही अधिक्षक शहरामधून बाहेर आणि त्यांचे डीएमसी ही. हे कितीपर्यंत योग्य आहे.
**मा. आयुक्त :-**
योग्य नाही. परंतु तुम्हीसुध्दा ठराव करताना म्हटले होते की, सचिवांना घ्या, इंजिनिअरना घ्या.
**जुबेर इनामदार :-**
साहेब, आम्ही सध्या वृक्षप्राधिकरण समिती विषयी बालतो. तेवढेच उत्तर दया.
**मा. आयुक्त :-**
त्यांचेपण तत्वज्ञान तसेच असणार ना?
**जुबेर इनामदार :-**
आम्ही गेलो नाही म्हणून सध्या तो विषय येऊ शकतो.
**मा. आयुक्त :-**
तुम्ही गेले नाहीत म्हणून बोलू शकता. तुम्ही गेले असता तर तिथून बोलले असता काय?
**जुबेर इनामदार :-**
आल्यानंतर चर्चा केली असती.
**मा. आयुक्त :-**
११ तारखेला येणार आहेत.
**मिलन म्हात्रे :-**
श्री, सुधीर राऊत का आले नाही? त्यांनी चार्ज घेतला का?
**मा. आयुक्त :-**
त्यांनी चार्ज घेतला.
**मिलन म्हात्रे :-**
आज लेट का झाले ?
**मा. आयुक्त :-**
आज ते तळेगाववरून सामान आणायला गेले. त्यांनी सांगितले की, मा. स्थायी समितीला समजावून सांगा, मी आज दिवस लेट येईन.
**मिलन म्हात्रे :-**
ही सुरूवातच चुकीची आहे ना?
**मा. आयुक्त :-**
काल दुपारी कोर्टाची ऑर्डर झाली. आणि काल दुपारी ४.०० वाजता चार्ज घेतला.
**मिलन म्हात्रे :-**
मा. आयुक्तांची पोस्ट असती तर आम्ही इकडे एका तासात आयुक्त आलेले बघितले आहे. इथे सगळे क्विक असते मग ही क्वीकनेस याच्यात काय? प्रभारी येऊन पटापट सगळ्या सह्या करून मोकळे.
**मा. आयुक्त :-**
बाकीचे लोकपण म्हणत होते की, हा तिसरा टर्म आहे हे खुर्च्या शेकवायला लागले.
**मिलन म्हात्रे :-**
ते मला माहिती नाही. मी कुठल्याही आयुक्ताचे नाव घेतलेले नाही.
**मा. आयुक्त :-**
मी नागरीकांचे म्हणतो.
**मिलन म्हात्रे :-**
श्री. आर.डी. शिंदेचे नाव घेतो. तुम्ही प्रभारी गेलात नंतर श्री. आर.डी.शिंदे आले आणि तमाशा केला.
**अनिल सावंत :-**
साहेब, तुम्ही सेम डे ला आलेले. श्री. जाधव साहेब सुध्दा सेम डे आले होते.
**मा. आयुक्त :-**
माझी अडचण होती म्हणून मी गडबडीने आलो.
**अनिल सावंत :-**
मला वाटते की, आचारसंहितेच्या पूर्वी आता ही शेवटची मिटींग असेल.
**मा. सभापती :-**
सभेला सुरूवात करावी.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ते बरोबर नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, सध्या स्वाईन फ्ल्यु हा जो प्रकार चालू आहे. आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेने त्याच्यावर काय उपाय केले आहेत?

**मा. आयुक्त :-**

महापालिका हद्दीमध्ये नाही. पण खाजगी हॉस्पीटलमध्ये रिझर्व्हेशन ठेवलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता स्वाईन फ्लुचे जे चालू आहे. तर आपण लसीकरण वगैरे टेस्टींग वगैरे काही करतो आहे का?

**मा. आयुक्त :-**

तपासणी चालू आहे. आमच्याकडेपण चालू आहे. खाजगी हॉस्पीटलापण पत्र पाठवले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण पालिकेतर्फे असे काही केंद्र उघडले आहे का, जिथे आपण चेक करू शकतो? नागरिकांमध्ये अशी घबराहट पसरली आहे की, आपल्या महानगरपालिकेमध्ये आहे की नाही?

**मा. आयुक्त :-**

आपल्या महापालिकेत अजून आलेले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्वाईन फ्लू नसेल. चांगली गोष्ट आहे. परंतु काही तपासणी केंद्र चालू केले की नाही?

**मा. आयुक्त :-**

तपासणी केंद्र चालू आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, यांनी जो विषय काढला आहे. मागचा अनुभव असा आहे की, आपल्याकडे पालघर, डहाणूला डेंग्यु झाला. लेप्टो झाला. मुंबईला झाला. आपल्याकडे नंतर पटापट डिटेक्ट व्हायला लागले आणि माणसे मरायला लागली. आपल्याकडे लेट झाला. भक्ती वेदांतचा त्यावेळेचा २००५ चा जुलै ऑगस्टचा रेकॉर्ड तुम्ही बघू शकता. आमची रिक्वेस्ट अशी आहे की, याच्यावर आपण नुसती चर्चा न करता. आपले जे पथक आहे. त्यांचा प्रमुख इकडे कोण आहे? त्यांनी त्यांचा आजपर्यंत रिव्ह्यु काय घेतला की, शंभर पेशंट तपासले. त्यातील चार साधारणत: मिळाले.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मेरी सुचना है की, महानगरपालिका के तरफसे लोगों को केबल पर सुचना दि जाए की, उसके क्या क्या लक्षण है और उसमे क्या सावधानी बरतनी चाहिए।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आणि तपासणी केंद्र कुठे आहेत?

**मा. आयुक्त :-**

आपले जे आरोग्य केंद्र आहेत. तिथेच तपासणी केंद्र आहेत. हॅन्डबिल काढा आणि पेपरला द्या की, काय प्रिकॉशन्स घ्यायला पाहिजेत. त्याची लक्षणे सांगा.

**डॉ. चकोर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. त्याच्यामध्ये खोकला येतो. अचानक ताप येतोय श्वास घ्यायला त्रास होतो. यासारखी लक्षणे आढळतात आणि घशामध्ये सूज येते. घशामध्ये दुखते. याच्याबद्दल आपण एक निवेदन दर आठ दिवसाला एक प्रेसनोट देतो. आणि तपासणीबाबत जर तुम्ही बोलत असाल तर तपासणी फक्त कस्तुरबा हॉस्पीटलमध्ये केली जाते. कालच्या न्युजनुसार त्यांनी आपल्याला परवानगी दिली की, प्रायव्हेट हॉस्पीटलमध्ये ती तपासणी होईल. त्यावर निवेदन देतो. आता आपल्याला जे स्वाईन फ्ल्युचे लिटरेचर आलेले आहे. एक निवेदन ते आजच मी छापायला दिलेले आहे. त्याची सगळ्यांकडे...

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डॉक्टर साहेब, तुम्ही तपासणी केंद्र सुरू करणार आहात की नाही?

**डॉ. चकोर :-**

सध्यातरी त्याची तपासणी कस्तुरबा हॉस्पीटलमध्ये केली जाते.

**जुबेर इनामदार :-**

करावी लागली तर याचा खर्च येत असेल ना?

**अनिल सावंत :-**

डॉक्टर साहेब, स्वाईन फ्लु किंवा एच-१ एन-१ ची तपासणी करण्याची क्षमता आपल्याजवळ आहे का? म्हणजे आपण डायग्नोसीस करू शकतो का? हे हसण्यावारी नेऊ नका.

**डॉ. चकोर :-**

आपण क्लीनीकली डायग्नोसीस करू शकतो.

**अनिल सावंत :-**

काय करू शकतो.

**डॉ. चकोर :-**

जर तसा कोणताही रूग्ण आढळला तर आपण त्याला कस्तुरबाला पाठवू शकतो.

**अनिल सावंत :-**

कस्तुरबाला पाठवू शकतो? इथे आपण परफेक्ट डायग्नोसीस करू शकत नाही? मला आत्ता एक सांगा शहरामध्ये सध्या कोणती साथ सगळ्यात जास्त आहे.

**डॉ. चकोर :-**

मलेरियाची साथ आहे.

**अनिल सावंत :-**

मलेरियाची साथ आहे. फ्लुचीपण साथ आहे हे तुम्हाला माहिती आहे का? त्याच्यामध्ये प्रायव्हेट डॉक्टरचे जे डिस्पेन्सरी आहेत. तिथे तुम्ही आजची परिस्थिती  कोणत्याही वेळेला बघितली. तिथे काय गर्दी असते आणि सेम जॉईन्ट पेन, बॉडी पेन आणि फिव्हर. हे जे सिम्पटम तुम्ही म्हणता एच-१, एन-१ जसे श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी सांगितले. मॅक्झीमम त्या केसेस आहे. मग त्याच्यासाठी त्यांना कस्तुरबाला पाठविण्याविषयी तुम्ही रेकेमेंन्ड केले आहे का?

**डॉ. चकोर :-**

तसे एक निवेदन छापले होते. त्याच्यामध्ये म्हटले होते. त्यांची एक प्रत श्री. दिवटे साहेब, यांच्याकडे जेव्हा चार्ज होता तेव्हा त्याची एक प्रत दिली होती. फ्लुमध्ये जे जॉईन्ट पेन वगैरे आहे, ती सगळी लक्षणे आढळतात. प्रत्येक जॉईन्ट पेन स्वाईन फ्लु असेल असे नाही.

**अनिल सावंत    :-**

तसे नाही. पण त्याच्यामध्ये काही केसेस, कारण फ्लु आणि एच-१ एन-१ चे साधारण जे सिम्पटमस् आहेत ते सेम आहेत. त्यानंतर दुसरा मुद्दा असा आहे. आपल्या मिरा भाईंदर शहरातील जे लोक बाहेर, आऊट ऑफ इंडिया गेले होते. टुरसाठी म्हणा किंवा जॉबसाठी म्हणा. आणि ते लोक आलेले आहेत. त्याच्यांमध्ये अशी तापाची लक्षणे आढळली अशा काही केसेस तुमच्या जवळ आल्या आहेत का?

**डॉ. चकोर :-**

एअरपोर्टवर ठाणे महानगरपालिकेचे चौदा ते पंधरा अधिकारी कार्यरत आहेत.

**अनिल सावंत :-**

पुण्यामध्ये एअरपोर्टवरसगळे होतेच ना?

**डॉ. चकोर :-**

तिथून कुठलाही रूग्ण जर बाहेर जाऊन आलेला असेल, तो जर आपल्या महानगरपालिकेच्या हद्दीत येत असेल तर त्याची माहिती ते डीएचओ ला देतात. आपल्याला डीएचओ तर्फे ती मिळते आणि त्यानुसार आत्तापर्यंत अशी माहिती आपल्याकडे आलेली नाही. तशी जर समजा आली तर आपले कर्मचारी दररोज त्या व्यक्तीच्या  घरी जाऊन भेट देतात. आणि जर तसे काही सिम्पटम आढळायला लागले तर त्यानंतर त्याला..

**अनिल सावंत :-**

डॉक्टर साहेब, तुम्ही रेकमेंन्ड केल्यानंतर कस्तुरबामध्ये आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी काही वेगळे असे काही ठेवले आहे का?

**डॉ. चकोर :-**

असे काही नाही.

**अनिल सावंत :-**

म्हणजे रूटीन. त्याच लाईनमध्ये?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डॉक्टर साहेब, शहरामध्ये डेंग्युचे पेशन्ट किती आहेत?

**मा. आयुक्त :-**

आले आहे का हे विचारून विनाकारण प्रसिध्दी माध्यमाला इथे काही आले आहे का म्हणून चिकित्सा व्हायला नको. प्रत्यक्षात आपल्याकडे अजून  नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, नाही हे बरोबर आहे. पण आपली तयारी पाहिजे ना? जर समजा उद्या...

**मा. आयुक्त :-**

तयारी करून ठेवलेली आहे. परंतु कुठे ॲडमिट करायचे पेशंट आल्यानंतर आमचे जे डॉक्टर केंद्रावर तपासतात त्यावेळेला त्यांना गुणधर्म आढळला की, लगेच त्या पेशंटला आपण कस्तुरबामध्ये घेऊन जातो. आणि पुर्ण चिकित्सा करतो.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, डायग्नॉसीस हा ब्लड टेस्ट शिवाय होऊ शकत नाही. आपल्या महापालिकेकडे ब्लड टेस्टची सोय कुठे आहे?

**मा. आयुक्त :-**

नाही. म्हणूनच आम्ही प्रायव्हेट सेक्टरला घेऊन जातो. पेशन्ट आमच्या ॲम्ब्युलन्सने घेऊन जातो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डॉक्टर साहेब, शहरामध्ये डेंग्यूचे पेशंट किती आहेत?

**डॉ. चकोर :-**

डेंग्यूचे संशयित चार रूग्ण आत्तापर्यंत आहेत.ॉ

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कुठे कुठे आहेत?

**मा. आयुक्त :-**

संशयीत.

**ध्रुवकिशोर पाटील ;-**

साहेब, डेंग्युचे पेशंट आहेत.

**डॉ. चकोर :-**

डेंग्युचे संशयीत चार आहेत.ॉ

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डेंग्यु झालेले आहेत. ॲडमिट आहेत.

**शरद पाटील :-**

संशयीत नाहीत. माझ्या वॉर्डमध्ये पण सध्या एक डेंग्यु झालेला रूग्ण आहे.

**डॉ. चकोर :-**

साहेब, आपण डेंग्यु संशयीतच म्हणतो. जव्हा त्याच्या काही टेस्ट आहेत, पुण्याला जेव्हा येईल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

डॉक्टरने स्टॅम्प मारून सर्टिफिकेट दिले आहे. त्याची ट्रीटमेंट चालू आहे. माझ्या वॉर्डामध्ये आहे.

**मा. आयुक्त ;-**

कोणी चेक केले?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्हीच बोललात की, चार पेशंट आढळले कुठले कुठले आहेत?

**मदन उदितनारायण सिंह :-**

डॉ. रजनानीचे आहेत. हॉस्पीटला ॲडमिट होता. त्याला डेंग्यू आहे. आणि त्याची ट्रीटमेंटपण झाली आहेत. माझ्या वॉर्डामध्ये.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझ्या वॉर्डमध्येपण एक डेंग्यूची केस आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

डॉक्टर साहेब, डेंग्यु, मलेरिया, फ्लु चालू आहे. आपली औषध फवारणी वगैरे व्यवस्थित करा. औषध तपासून म्हणजे चांगली औषधे जातात का? ते फक्त पाणी मारतात. त्याच्यावर जरा लक्ष दिले पाहिजे. स्वाईन फ्लु का केबल पर भी दिया जाए।

**जुबेर इनामदार :-**

साहेब, गेल्या मा. स्थायी समितीमध्ये डेकोरेटरचा विषय होता. आपण सांगितले होते की, माझ्या दालनामध्ये बोलावून त्या विषयाबद्दल वाटाघाटी करून घेतो. तुम्हाला मा. स्थायी समितीने ते अधिकार दिले होते. तो विषय झाला का?

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, ते जे रेट आहेत ते फारच अवाढव्य आहेत. त्यामुळे ते रेट कमी करण्याविषयी त्या लोकांना बोलावले होते. पण ते कमी करायला तयार नाहीत. उदाहरणार्थ, त्यामध्ये आपण जर एकच आयटम घेतला, टेबल फॅन. टेबल फॅनचे एका दिवसाचे भाडे साडेतीनशे रूपये आहे.ा

**जुबेर इनामदार :-**

साहेब खुर्च्या ११ रूपये आहेत. मार्केट मध्ये ५ रूपयांमध्ये आहेत. चार-पाच रूपये जास्त.

**मा. आयुक्त :-**

त्यांचे खुर्च्यांचे भाडे ११ रूपयांचे आहे. आणि बाजारात ५ रूपये आहेत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तुमच्या माहितीसाठी सांगतो ३० केव्हीचा जनरेटर सहा हजाराला मिळतो. त्यांनी १४ हजार..

**मा. आयुक्त :-**

१४ हजार लावलेले आहेत. त्यामुळे हे अवाढव्य रेट मी शिफारस केलेली नाही. आणि त्यांना बोलवून कमी करा म्हटले. ते कमी केलेले नाही. गेल्या वर्षाचे रेटच हे आहेत. आम्ही आत्ता सांगतो ते गेल्या वर्षाचे रेट आहेत.

**जुबेर इनामदार :-**

गेल्या वर्षी चुका केल्या होत्या त्या आपण परत करायच्या आहेत काय?

**मा. आयुक्त :-**

जरा थोडेसे समजावून तरी घ्या. अकरा रूपये प्रत्येक खुर्चीचे दर दिवसा भाडे ३५० रूपये एका टेबलफॅनचे एका दिवसाचे भाडे १४ हजार रूपये जनरेटरचे एका दिवसाचे भाडे.

**मिलन म्हात्रे :-**

होंन्डाचा नवीन जनरेटर ५४ हजाराना नवीन मिळतो. मी घेऊन आलो आहे.
माझ्याकडे पक्के बील आहे,

**मा. आयुक्त :-**

त्यामुळे दर कमी केले नाहीत तर फेर टेंडर काढावे लागतील.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. सुदामराव गायकवाड, श्री. आर.आर. जाधव यांनी ज्या चुका केल्या आहेत त्या तुम्ही करू नका. अजून वेळ आहे. गणपतीला १५ दिवस आहेत.

**मा. आयुक्त :-**

आम्ही व्यवस्था करू. म्हणजे गणपती जवळ आले म्हणून जी मटेरिअलची किंमत आहे ती किंमत आम्ही भाडे द्यायचे का? हे गेल्या वर्षीचे रेट सांगतो.

**शानू गोहिल :-**

रिकॉल करा.

**मिलन म्हात्रे ;-**

तुम्ही सरळ खरेदी करा. नाहीतरी तुम्ही मागे पंप आणले आहेत ना?

**मा. सभापती :-**

श्री. म्हात्रे साहेब, खरेदी केल्यावर दुसऱ्या वर्षी पुन्हा खरेदी करावे लागणार.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या अधिकाऱ्यांच्या घरी मिळतील.

**मा. आयुक्त :-**

आम्ही रेट कमी करून देऊ म्हणून सांगितले. गेल्या वर्षाचे रेट आणि चालू टेंडरचे रेट एकच आहेत. वॉटरप्रुफ मंडप २२ रूपये प्रति चौरस फुट. खुर्च्या ११ रूपये प्रत्येक दिवसाला. टेबल ५५ रूपये प्रत्येक दिवसाला भाडे, जनरेटर १४५००, लाकडी रेलींग ४० रूपये रनिंग फुट, स्पीकर सेट ५००० रूपये पर डे, हेलोजन १०० रूपये पर डे, एच.एम. लाईट ४५०० रूपये पर नग.

**जुबेर इनामदार :-**

४५०० हजार रूपये? साहेब त्याचे भाडे १५०० रूपये आहे. हेलोजन ४० रूपये भाडे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आम्हाला ही सगळी लिस्ट दया. आम्ही तुम्हाला इलेक्ट्रॉनिक आयटमचे नवीन वस्तुचे कोटेशन प्रोफार्मा वाईज आणून देतो.

**मा. आयुक्त :-**

सर्वांत महत्वाची बाब तुम्ही लक्षात घेत नाहीत.

**अनिल सावंत :-**

नवीन वस्तू आणून यावर्षी तुम्हाला मिळतील. पुढच्या वर्षी मिळणार नाहीत. कारण त्या वर्षभर वापरल्या जातात.

**मिलन म्हात्रे :-**

विकत घ्यायची नाही.

**मा. आयुक्त :-**

वस्तुस्थिती अशी आहे की, आम्ही सही करून दिल्यानंतर तुम्ही रिपोर्टप्रमाणे मंजुर म्हणणार. आम्ही निगेटिव्ह देतो. तुम्ही मंजुर करणार का?

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला विषय कळला नाही.

**मा. आयुक्त :-**

आम्ही ज्या वेळेला रिपोर्ट करतो. त्यावेळेला रिपोर्टप्रमाणे प्रस्तावना देतो. त्या प्रस्तावानेप्रमाणे मंजूर म्हणता.

**मिलन म्हात्रे :-**

मग ते रेट कोणी आणले?

**मा. आयुक्त :-**

आम्ही निगेटिव्ह देतो की, हे अवाढव्य दर आहेत. हे नामंजुर करावेत. तर तुम्ही मंजूर म्हणा. आमच्या सहीने आमच्यावर ढकलून तुम्ही मंजूर करणार आणि आम्हाला अडकवणार. आमची सही असते. तुमची नसते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही गेल्या मिटींगचा अजेंडा बघितलाच नाही. तुम्ही मंजूर करा म्हणून सांगितले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अजेंडा वाचून दाखवा.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्तांना एक विनंती करतो. माझी गोष्ट तुम्हाला सांगितली बरोबर आहे. परंतु प्रश्न असा आहे. आपण निविदा काढतो निवेदेमध्ये टेंडर आले. नंतर आपण काय करणार आहोत? टेंडर पास करायचे की नाही ती महत्वाची गोष्ट आहे. मला ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

फेर टेंडर काढू.

**मा. सभापती :-**

कशासाठी? तुमच्याकडे तीन टेंडर आले आहेत. जी कमी निविदा आहे. त्याचे पास करायला पाहिजे.

**मा. आयुक्त ;-**

मग कितीही दर असले तरी चालतील?

**मा.सभापती :-**

काही असू दया. तुम्ही बघायला पाहिजे. तिकडे टेंडर भरणारी माणसे आली पाहिजे. भरायला कोणी आले पाहिजेत की नाही?

**मा. आयुक्त :-**

भरायला कोणाला येऊ देत नाहीत.

**अनिल सावंत :-**

ही वस्तुस्थिती आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब ई-टेंडरींग करा ना.

**मा. आयुक्त :-**

पोलिस बंदोबस्त ठेवतो.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, याच्याकरीता टेंडरींगची गरज लागणार तेवढे काम अवलोकनामध्ये होऊन जाईल. तुम्हाला जसे लागेल तसे मागवा. तुम्ही तेवढे अवलोकनामध्ये करू शकता. या विषयाकरीता टेंडरची गरज काय आहे? साहेब, खुर्च्या अकरा रूपये पर नग देतात. त्याच्यामध्ये किती आले ते मोजायला कोण जातो? दोनशे दिल्या की, पाचशे दिल्या? त्याच्यामध्ये तशाच चो-यामा-या होत असतील.

**मा. आयुक्त :-**

फेर टेंडर काढून मी तुमच्यापुढे आणतो.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्या महापालिकेची फार भयानक परिस्थिती आहे. दोन दिवसांपूर्वी तुम्ही हॉस्पीटलच्या इक्वीपमेंटचे टेंडर काढले. दोघातिघांनी भरले त्यांना मारून पाठवून दिले. त्यांच्या रसीद त्यांच्याकडून खेचून घेतल्या. त्यांना धोपटले आणि मारून पाठवले.

**मा. आयुक्त :-**

मी कालच सांगितले की, प्रत्येक टेंडरला पोलिस बंदोबस्त लावायचा आणि माझ्या केबिनला टेंडर बॉक्स ठेवायचा.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, मला एक सांगा हे जे कॉन्ट्रक्टर जेवढे नगरसेवक येत नसतील तेवढे डेली, कायम म्हणजे तुमचे ऑफीसर किंवा कर्मचारी येत नसतील त्यांचा डेरा इथे कायम असतो महापालिकेमध्ये एवढी कामे असतात? प्रत्येक डिपार्टमेंट त्यांनी घेरून ठेवलेले असते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब विशेष म्हणजे तुम्हाला गंमत सांगतो, कॉन्ट्रॅक्टर त्या अधिका-यांसमोर बसलेले असतात आणि नगरसेवक उभा असतो आणि हे अधिकारी त्या कॉन्ट्रॅक्चरला उठवू पण शकत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

सर्व खातेप्रमुखांनी नोंद घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

तसे आढळून आले तर तुम्ही काय करणार ते सांगा. नोंद काय घ्यायची?

**मा. आयुक्त :-**

नोंद घ्यायचे नाही. मी त्यांना वेगळे सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

ॲक्शन काय? आत्ता आवारात जाऊन वघा. आम्हाला गाडी पलिकडे पार्क करावी लागते.

**मदन उदितनारायण सिंह :-**

नगरसेवकोंको गाडी खडा करने को जगह मिलती ही नही है। नगरसेवकोंको गाडी खडा करने मे २० मिनिट लगता है।

**मिलन म्हात्रे :-**

पत्र देऊ न ठेवले अहो. अधिकाऱ्यांच्या सगळ्या गाड्या दिवसभर आणि रात्रीसुध्दा, रात्री तुम्ही तुमचा कॅम्पस चेक करा. त्याच्यामध्ये अधिकाऱ्यांच्या गाड्या रात्री इकडे असतात. पत्रकारांच्या गाड्या इकडे असतात. तुमची सिक्युरीटी त्यांची गाडी सेक्युर करायला ठेवली आहे का? आत्ता बंद पडलेल्या गाड्या त्या बॅरेकमध्ये आणून ठेवल्या आहे. तुम्ही त्या गोडाऊनमध्ये ठेवल्या पाहिजेत. तुमच्या रनिंग गाड्या तिकडे राहतील. वाहनप्रमुखांनी याचा खुलासा करावा की, किती बंद गाडया खाली पडल्या आहेत? नाहीतर मी नंबर देतो. साहेब, आमच्या गाड्या दररोज आम्ही तिकडे पलिकडे पार्क करायच्या आम्हाला १५ मिनिटांकरिता गाडी उभी करायला मिळत नाही. याच्यावर ॲक्शन होत नसेल तर मा. आयुक्त आणि मा. महापौरांच्या समोर आम्ही आमची गाडी दिवसभर पार्क करणार. पत्र देऊन झालेले आहे.

**मा. आयुक्त :-**

सर्व खातेप्रमुखांनी ठेकेदार बसवून ठेवण्याऐवजी  आपले सभासद आल्यानंतर ठेकेदारांना उठवणे गरजेचे आहे आणि ठेकेदारांना कंटीन्यु २४ तास तिकडे बसवून ठेवण्याची गरज नाही. जर असे आढळे तर त्या विभाग प्रमुखावर कार्यवाही केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

काय प्रकारची? सेक्शन सांगा.

**मा. आयुक्त :-**

५६

**मिलन म्हात्रे :-**

हसू नका. हे तुमचे रूलिंग आहे.

**मा. आयुक्त :-**

करू ना.

**मिलन म्हात्रे :-**

कारण ठराव झालेले असतात. पालन कोणी करत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

लोकप्रतिनिधींना आदराने वागवणे हे तुमचे कर्तव्य आहे. त्यासाठी ठेकेदार किंवा नागरिक असताना जर सभासद आले तर त्यांना प्रेफरेन्स देऊन कॉन्ट्रॅक्टरना बाहेर घालवायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुमच्याकडे तशा प्रकारचे जी.आर.पण आहेत मी तुम्हाला देतो.

**मा. आयुक्त :-**

कॉन्ट्रॅक्टरला कंटीन्यु इकडे बसवून ठेवायची काही गरज नाही. वॉचमनला ऑर्डर द्या की, ठेकेदारांच्या गाड्या काही अधिकाऱ्यांच्या गाड्या आणि पत्रकारांच्या गाड्या आत येऊ देऊ नका. त्यांना बाहेरच पार्किंग करून येऊ द्या.

**मिलन म्हात्रे :-**

रात्री कोणाच्या असतात. त्या गाड्या सुध्दा काढायला लावा.

**मा. आयुक्त :-**

नाईटला मी पाहिलेले नाही. बघून तुम्हाला सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

मी तुम्हाला सांगतो. मी खोटे बोलतो तर मी तुम्हाला फोटो देतो.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही खोटे बोलता असे माझे म्हणणे नाही. नाईटला जर कोणाच्या गाड्या असतील तर त्या बाहेर काढू.

**मिलन म्हात्रे :-**

मी असे कुठे बोललो आहे की, तुम्ही जाऊन बघा. मी सांगतो, मी जिम्मेदारी घेतली आहे.

**मा. आयुक्त :-**

रात्री कोणाच्या गाड्या पार्किंगला असतील तर त्या बाहेर काढल्या जातील.

**मिलन म्हात्रे :-**

आणि बंद पडलेल्या गाड्या आपल्याकडे कशाला ठेवल्या आहेत?

**मा. आयुक्त :-**

बंद पडलेल्या गाड्या आरटीओ कडून चेक करायला दिलेल्या आहेत. दहा वर्षापेक्षा जास्त दिवस झालेले लिलावाने विक्रिला परवानगी द्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तसे नाही. त्या गाड्या हलवून इतर ठेवा. टाकीवर वैगेरे भरपूर जागा आहे. त्या प्रमुखांना इकडून गाड्या हलवायला सांगा. तेवढी जागा मोकळी होईल.

**मा. आयुक्त :-**

बंद पडलेल्या गाड्या सगळ्या पाण्याच्या टाकीवर हलवा आणि त्या सिक्युरिटीच्या ताब्यात दया.

**मिलन म्हात्रे :-**

इकडे वाहन प्रमुख कोण आहे? आत्ता सगळे नवीन चार्ज दिले आम्हाला काहीच माहिती नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, एक शंका आहे. विचारू का? तुम्ही आत्ता सांगितले की, वॉचमेनला ऑर्डर द्यायची की, बाहेरच्या गाड्या म्हणजे पत्रकार म्हणा किंवा एक्सवायझेड कोणीही म्हणा. एक्सेप्ट लोकप्रतिनीधी त्यांच्या गाड्या तो वॉचमेन येऊ देणार नाही. पण जर वॉचमेनच त्या कॅपेबिलिटीचा नसेल...

**मा. आयुक्त :-**

माझ्या सहीचे पत्र देणार. तो वॉचमेन माझ्या सहीचे पत्र दाखवेल.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचा कंट्रोल एचओडी ला द्या.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब आपण तिकडे एन्ट्री बुक ठेवु शकतो का? जे महापालिकेमध्ये येतात त्यांची नोंदवही ठेवा.

**मा. आयुक्त :-**

रजिस्टर ठेवू. किती वाजता आले आणि किती वाजता बाहेर गेले.

**अनिल सावंत :-**

आणि काय कारणासाठी? काम काय आहे? कोणत्या डिपार्टमेंटचे काम आहे?

**मिलन म्हात्रे :-**

बरेचसे पत्रकार बाहेर लॉजमध्ये असतात आणि गाड्या इकडे असतात. साहेब, पान क्र. १७ ला जो हॉस्पीटलचा विषय आहे. ठराव क्र. ११७, जो आपण दिला आहेत. त्याच्यामध्ये त्याची प्रगती वगैरे काय आहे? कारण त्या मॉर्ग रूमचे काम प्रायोरीटीवर झाले पाहिजे. मा. स्थायी समिती सभा दि. १७/०२/२००९. आत्ता आपले जीइ वगैरे यांचे काही लक्ष आहे का? सिटी इंजिनिअर जातात का? प्रोग्रेस काय आहे? किती महिन्यापासून आत्ता पहिला मजला कुठपर्यंत झाला पाहिजे?`मी मॉर्गरूमचे बोलतो, हॉस्पीटलचे बोलत नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, श्री. किणी म्हणून डेप्युटी इंजिनिअर आहेत. ते अधूनमधुन व्हिजीट करतात आणि कार्यकारी अभियंता श्री. खांबीत जातात. आणि हे श्री. गिरिष प्रधान डे-टू-डे वर्क बघतात.

**मिलन म्हात्रे :-**

अहवाल द्या ना. आपले काम सुरू झाले त्याच्यापासून किती काम व्हायला पाहिजे होते आणि किती झालेले नाही? कारण आपल्याला शवागृहाची प्रायोरिटी आहे. बॉड्या ठेवायला आजच्या तारखेला जागा नाही.

**मा. आयुक्त :-**

ऑर्डर केव्हा दिली कितीपर्यंत काम झाले, कितीपर्यंत व्हायला पाहिजे याचा अहवाल पुढच्या मिटींगला देऊ.

**मिलन म्हात्रे :-**

आणि तो जो गॅप आहे की, तेवढ्या पिरिएडमध्ये झाले पाहिजे. कारण मागच्या वेळेला एका नगरसेवकाने तिकडे जाऊन मारहाण करण्याचा प्रयत्न केला. त्याचे कॉग्नीन्स या अधिकाऱ्यांनी घेतले. श्री. भगवती प्रसाद शर्मा यांनी टेंबावर जाऊन दोन्ही कॉन्ट्रॅक्टरच्या माणसांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला.

**मा. आयुक्त :-**

का?

**मिलन म्हात्रे :-**

ते त्यांना विचारा. त्यांना ते माहिती आहे. तुम्हाला त्यांनी रिपोर्टींग केले का? तक्रार करणे निराळे, तक्रारीचे निवारण करणे निराळे आणि ही परिस्थिती निराळी. आत्ता मला सांगा की, ती माती का जमली? तो

प्रकार का झाला?त्याच्या मागचे मुळ आपण शोधू या. आपले अधिकारी अजून तिकडे कोणीही गेले नाहीत. त्यांनी वेळीच ती सगळी साफसफाई केली नाही. त्यामुळे पाणी जाम झाले ना? कॉन्टक्टरवर नियंत्रण कोणाचे.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेचे

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता हे जात नाहीत. साहेब, दोन तासात तर माती जमा झाली नाही. त्याला १५-२० दिवस लागले असतील. पाण्याचा निचरा डेली झाला पाहिजे. तुमचे अधिकारी, कोण जीई वगैरे असतील ते गेले नाहीत म्हणून हे सगळे झाले. आणि तो प्रकार होत आला. नागरिक रस्त्यावर का उतरले? आत्तापर्यंत का नव्हते? कारण पाणी जात होते. साहेब, दृष्टीकोन असा आहे की, १५-२० दिवसांपासून कोणीही रिपोर्टींग करत नाही. एका बिल्डरने काम थांबवून ठेवले आहे. अजून तिकडे त्याचे चालले आहे की, एवढी माझी जागा वाचवा, तेवढी वाचवा. त्याला जागा द्यायची असेल तर लेखी पट्टा बनवून देऊन टाका विषय संपला.

**मा. आयुक्त :-**

कोण देणार आहे?

**मिलन म्हात्रे :-**

देत नसाल तर कंम्पाऊंड बांधा.

**मा. आयुक्त :-**

आम्ही देणार नाही.

**मिलन म्हात्रे:-**

मग कंम्पाऊंड बांधा.

**मा. आयुक्त :-**

कोणाला व कशासाठी आम्ही देऊ.

**मिलन म्हात्रें :-**

कंम्पाऊंड का बांधले नाही हे त्यांना विचारा. सिटी इंजिनिअरला विचारा की, कुठचे काम आहे. तो बिल्डर आला की, दोन्ही जेई पळतात. ठेकेदार मार खाणार काय?

**मा. आयुक्त :-**

बाऊन्ड्री प्रमाणे बांधून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

ते जर काम झाले नाहीतर पनिशमेंट काय ते सांगा. सहा महिने आम्ही ओरडतच राहायचे? तुमच्याकडे फोनवर माझ्या ४-४ तक्रारी झाल्या.

**मा. आयुक्त :-**

कोणाच्या?

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या. मी कितीतरी वेळा सांगितले. असे असेल तर मी उद्या तुमच्याकडे पत्र देतो. मला एक सांगा ऑर्डर झाल्यापासून त्या बिल्डरचा स्पेसिफीक स्पेस का बांधून झाला नाही? तुम्ही स्वतः जाऊन त्यावेळा बघून आलात? फेरी मारली?

**मा. आयुक्त :-**

बघून आलो.

**मिलन म्हात्रे :-**

अजूनपर्यंत आहे तीच परिस्थीती आहे. अजून काम झालेले नाही. याचे काय ते उत्तर सांगा. तुम्ही जाऊन आले त्याला महिना झाला.

**मा. आयुक्त :-**

पण काम प्रोग्रेस आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नाही साहेब. मी तुम्हाला काय म्हणतो, आपण भाषा वळवून ती कामे होत नाहीत. मला सांगा तुम्ही जाऊन आला. त्या स्पेसला तेवढे कंपाऊन्ड वॉल झाले की नाही? किती उंच झाले? फाऊन्डेशन टाकले आहे का? काहीच नाही,. तेवढा स्पेस तेवढाच सुटलेला आहे. बाकीच्या कामांबद्दल आमची तक्रारच नाही. जे प्रोग्रेसमध्ये आहे. त्याच्याबद्दल तक्रार कुठे आहे?

**दिपक खांबीत :-**

लाईन आऊट बघतो.

**मिलन म्हात्रे :-**

ही लाईन आऊट आम्ही जमिन घेतल्यापासून बघतो.

**मा. आयुक्त :-**

लाईन आऊट आपण प्रत्येक वेळेला बघतो. कंम्पाऊंन्डची उंची किती वाढवली ते त्यांना पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

फाऊन्डेशनचे काम सुरू झालेले नाही. कंम्पाऊन्ड वॉलचे काम सुरू झालेले नाही.

**मा. आयुक्त :-**

करून घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

नसेल तर ती त्याला दान देऊन टाका किंवा पट्ट्यावर द्या, बक्षिस द्या, इनाम द्या. चालेले, मग आपला हा विषया संपेल.

**जुबेर इनामदार :-**

दि. १७/०२/२००९ व दि. २५/०२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४९ :-**

दि. १७/०२/२००९ व दि. २५/०२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४२ :-**

दि. १७/०२/२००९ व दि. २५/०२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- सौ. सुनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

परिवहन व विशेष समित्यांचे ठराव, निरंक, आयुक्तांकडील पत्र व कामकाज. मिलन म्हात्रे यांचा विनंती अर्ज आहे. विषय आहे, मिरा भाईंदर महापालिका नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान वापरासाठी नियम करणे.

**मिलन म्हात्रे :-**

फक्त त्या सुभाषचंद्र बोस मैदानाचेच नाही. तुमच्या अखत्यारित जेवढी आहेत, तुमचे प्लेग्राऊन्ड आहेत. मी त्याच्या मध्ये थोडेसे मॉडीफीकेशन केले आहे.

**मा. आयुक्त :-**

नियम बनवून मा. महासभेपुढे ठेवतो.

**मिलन म्हात्रे :-**

आपले जेवढे क्रिडांगणे आहेत. भविष्यात आपण बि.ओ.टी. वर देऊ किंवा काही असेल. त्याच्यात त्याला आपली उपविधी लागणारच. त्या उपविधीनुसार आपल्याला त्याचे ॲग्रीमेंट बनवावे लागणार. जे काही पुढे द्याल ते उद्या तुम्ही ॲग्रीमेंट बनवले. त्यादिले उद्या तो तिकडे बियर शॉप पण काढेल. त्या करिता आपल्या उपविधी गार्डन, प्ले ग्राऊन्ड त्याच्यानंतर आत्ता पार्क होणार आहे. हे सगळे विषय समाविष्ट करून तुम्ही ते मा. महासभेपुढे आणा. म्हणजे त्याला एक फॉर्मल कायद्याचे स्परूप मिळेल अशी माझी विनंती आहे.।

**ग्रिटा फॅरो :-**

साहेब, आपल्या इकडे आलरेडी ११७ चा ठराव झालेला आहे. त्याच्यामध्ये भाडे वगैरे लावलेले आहे. इथे ऑलरेडी २५० रूपयांचे भाडे लावलेले आहे. माझ्या मते जे नेट वापर करण्यासाठी आपण तिथे जो देऊ त्याला जे आपले स्थानिक असतील त्यांच्यासाठी पाचशेपर्यंत कमी भाव ठेवायचा आणि जे बाहेरचे खेळाडू असतील त्याना भाडे वाढवून द्यायचे आणि त्याचबरोबर इलेक्ट्रीसीटीपण वापरतो त्याच्यासाठी आपण भाडे वाढवून द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

स्थानिक म्हणजे कोण?

**ग्रिटा फॅरो :-**

स्थानिक म्हणजे आपले आणि बाहेरचेपण खेळायला येतात.

**मिलन म्हात्रे :-**

खेळ हा जो आहे, आत्ता आपल्याकडे रोहित शर्मा होता. त्याने भाईंदरमध्ये नाव केले. त्याच्यामध्ये जे काही रेट ठेवायचे ते एकच ठेवा.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही त्या सुचना द्या. पुढच्या स्टँडींगला ते विषय आणतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण बीओटी वर शिवार गार्डन दिले आहे. ते अजूनपर्यंत झाले नाही. त्याची ऑलरेडी दोन वर्षे कम्प्लीट होऊन गेलेली आहेत. त्याचा सध्याचा स्टेटस काय आहे? आणि कधीपर्यंत कम्प्लीट होईल? आणखीन एक क्रिडांगण आपण गुजरात कॉर्पोरेशनला दिले होते. तर त्यांनी काय केले? गुजरात एन्टरप्रायझेसला आपण जे दिले होते. त्याचे २०-२२ लाख रूपये भाडे इअर आपल्याला येणार होते. ते पण अजूनपर्यंत आलेले नाही. तर तो करणार आहे की नाही? त्याला काय प्रॉब्लेम आहेत?

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, हा विषय चालू असताना, मॅक्सेस मॉलमध्ये अजून ते झुले वगैरे लागलेले आहेत. तीस दिवस पूर्ण झाले.

**मा. सभापती :-**

तो विषय सोडून बोला.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त बारा महिने त्यालाच दिलेले आहे का?

**मा. आयुक्त :-**

कशाला?

**अनिल सावंत :-**

ते जे ग्राऊंण्ड आहे. ते मॅक्सस मॉल वाल्याला बारा महिने वापारायला दिलेले आहे?

**मा. आयुक्त :-**

१२ महिन्यांसाठी नाही, एका महिन्यासाठी आहे.

**अनिल सावंत :-**

मग एक महिना केव्हा पूर्ण झाला. की, अजून एक महिनाच चालू आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये टोटल जागेच्या १० टक्के जागा त्यांना कायम स्वरूपाची वापरायला दिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

ती १२ महिने आहे आणि इतर ९० टक्के जागा फक्त एक महिना?

**मा. आयुक्त :-**

नंतर ते प्लान अप्रुवड करून दिलेले, अग्रीमेंटसोबत पत्रपण आहे.

**अनिल सावंत :-**

मग तसे सांगा.

**मा. आयुक्त :-**

सांगितले.

**अनिल सावंत :-**

आत्ता विषय आला तेव्हा सांगितले. तुम्ही मागच्या दोन मिटिंगला तो रिपोर्ट दिला नव्हता.

**मा. आयुक्त :-**

दोन मिटींगला ते प्लान आपल्याला सापडत नव्हते. पत्र सापडत नव्हते. आत्ता सापडले म्हणून सांगितले.

**अनिल सावंत ;-**

तो रेकॉर्ड कोणाजवळ मिळेल?

**मा. आयुक्त :-**

नगररचना विभागात.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५०, आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**हेलन गोविंद :-**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर मनपा क्षेत्रातील जनता नगर रोडवरील पोद्दार हायस्कल ते हनुमान मंदिर (गणेश देवल नगर) येथे पोलादी जलवाहिनी अंथरणे. | रू.३९,४५,९८१/- |
| २ | उत्तन बस स्टॅन्ड ते लाईट हाउस परिसरात असलेली सिमेंटची जलवाहिनी बदलन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.१३,३५,०००/- |
| ३ | महानगरपालिकेव्दारे पाणी पुरवठा करणा-या खाजगी टँकरच्या प्रति फेरा दर निश्चित करणे. | रू.५०,००,०००/- |

उपरोक्त कामांकरीता महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या वार्षिक अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. सबब सदर कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**टेरी परेरा :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, ४९ चे आयुक्तांकडील पत्र आणि कामकाज मा. न्यायालयाचे मा. आयुक्तांना ऑर्डर आल्या आहेत. त्या आम्हाला स्टॅंडींगला कळवल्या आहेत?

**नगरसचिव :-**

माझ्याकडे आल्याच नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

लॉ ऑफीसरचे काम आहे. आयुक्तांचे पत्र हा विषय इकडचा काढून टाका.

**नगरसचिव :-**

द्यायला पाहिजे. सचिवांकडे त्या प्रकारचे काहीच आले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

२३ जुलैची ऑर्डर आहे. त्यानंतरची फ्रेश ऑर्डर आहे. ही मागवून घेत जा.

**नगरसचिव :-**

मला कसे माहिती. त्यांनी द्यायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

असे लिहा की, मा. आयुक्तांकडचे आम्हाला आजपर्यंत काहीच पत्र मिळाले नाही.

**नगरसचिव :-**

आले नाही तर मी निरंक लिहितो. आयुक्तांचे कामकाज आलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्हाला स्टेट गव्हर्नमेंटकडून जी पत्र आली किंवा आत्तापर्यंत याचे अवलोकन तुम्ही स्टॅंडींगला केले? तुम्हाला उच्च न्यायालयाचा आदेश आला. तुमच्याकडे इन्क्वायरी कमिटी बसली. आयुक्तांकडचे पत्र आले. आम्हाला स्टॅंडींगला त्याची कल्पना द्यायची नाही का? त्याच्यावर तुमची कमिटी बसली. उद्या तो ऑफीसर येणार. तो आपल्या पालिकेत बसणार. तुम्ही त्याची उठबस करणार. त्याला एक वाहन देणार.

**मा. आयुक्त :-**

त्याची अंमलबजावणी करण्याची निकालाची प्रत मागितलेली आहे ती मिळाल्यानंतर ......

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्याकडे २३ ची आली. मला तुम्ही सांगितले की, आली आहे, नेटवर पण आली.

**मा. आयुक्त :-**

कच्ची प्रत एकाने वाचायला दिली. निकालाची प्रत आल्यानंतर आम्ही ठेवणार आहोत. त्याच दिवशी आम्ही अर्ज दिला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा, २३ तारखेला निकाल झाला. आज आपली मिटींग ०७/०८ ला आहे. २३ आणि ०८, चौदा दिवस झाले.

**मा. आयुक्त :-**

साहेब, आम्ही अर्ज दिला आहे. पुढच्या मिटींगला ठेवतो.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला वकिलांचेपण पत्र आले नाही?

**मा. आयुक्त :-**

वकील निकालाची प्रत काढून कवरिंग लेटर जोडतात.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे साहेब, पण त्याच्या अगोदर वकील तुम्हाला पत्र देतात की अमुक अमुक झाले. याच्यात अमुक आहे, याच्यात स्थगिती आहे, याच्यात अमुक आहे, याच्यात तमुक आहे. आम्हाला याच्यात कसे कळणार? आता मी कोर्टात आहे म्हणून मला कळते. बाकीच्या लोकांना कसे कळणार?

**मा. आयुक्त :-**

निकालाची प्रत आणि कवरिंग लेटर आल्यानंतर बाकीच्या लोकांनापण समजावून सांगू.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणूनच सांगतो. आयुक्तांकडील पत्र या विषयावर २३ तारखेपासून टील टूडे कही पत्रव्यवहार आला नाही का?

**मा. आयुक्त :-**

वकीलांकडून आलेले नाही. निकालाची प्रत काढायला सांगितली असा मी श्री. आपटे साहेबांना फोन केला होता. निकालाची प्रत मिळाल्यानंतर कवरिंग लेटर जोडून देणार आहेत. ते आम्ही तुमच्यापुढे ठेवू.

**मिलन म्हात्रे :-**

पण वकिलांनी तुम्हाला कळवले नाही. आत्ता निकालाची प्रत..

**मा. आयुक्त :-**

तोंडी चर्चा झाली. परंतु निकालाची प्रत..

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण फार बॅलन्सींग बोलत जा. आक्ट्रॉयच्या मॅटरमध्ये, मला आठवते. त्यांनी तुम्हाला एका दिवसात पत्र दिले होते. आणि निकाल आला नव्हता. त्याचे इकडे वाचन झाले. श्री. आपटे साहेबांच्या पत्राचे वाचन लॉ ऑफीसरने केले. मग १४ दिवसांत श्री. आपटे साहेबाचे या विषयात पत्र का आले नाही? कारण ते टेंडर होते.

**मा. आयुक्त ;-**

हे बघा महत्वाचा मुद्दा ऑक्ट्रॉयच्या केसमध्ये स्टेटस्को दिला. नंतर हेअरिंग पूर्ण झाल्यानंतर डिसमीस झाले. डिसमीसमध्ये निकालाची प्रत काय वाचायची ती केस डिसमीसच झाली, या केसमध्ये डिसीजन झालेले आहे डिसीजन वाचून निकालाची प्रत आल्यानंतर सविस्तर अहवालासह ठेवायचे आहे. आत्ता ऑक्ट्रॉयची केस वकील कळवणार म्हणजे काय कळवणार की, केस डिसमीस झालेली आहे. तुमच्या नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करा.

**मिलन म्हात्रे :-**

तसे नाही. साहेब, पत्र नीट वाचा. त्या पत्रात असे दिले आहे की, या सभागृहात कुठलाही निर्णय घेण्यात येई नये. ते पत्र वाटत असेल तर मागवा आणि वाचून घ्या. मी एवढेच बोलतो की, ते पत्र तुम्हाला एक दिवसात आले. ह्या पत्राला चौदा दिवस लागतात?

**मा. आयुक्त :-**

या पत्राला १४ दिवस लागतात आणि हे पत्र लवकर आले हे म्हणणे नाही. प्रश्न असा आहे....

**मिलन म्हात्रे :-**

मी म्हणतो ना. मला ते महत्वाचे वाटते.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला महत्वाचे वाटते म्हणून आता बारा तेरा दिवस झाले.....

**मिलन म्हात्रे :-**

मला याच्यात वाद घालायचा नाही. वकीलांडून मागवून घ्या की, नेमके काय झाले आणि आम्हाला काय करायचे आहे. कारण तुम्हाला आठ आठवड्यांचे टाईम बॉन्ड लिमीट आहे.

**शानु गोहिल :-**

मा.सभापती साहेबांच्या परवानीगेने बोलते. साहब आज यहा पर पानी पुरवठा का जो विषय आर्थिक और प्रशासकिय मंजुरी के लिए आया है। हमारे श्री. बारकुंड साहब विषय लाकर मंजुरी ले लेते है। लेकीन उस मंजुरी के बाद मे उसका इम्प्लीमेंटेशन कब करना चाहिए, जरा यह खुलासा मुझे श्री. बारकुंड साहब करे।

**मा. सभापती :-**

मंजुरी देने के बाद इम्प्लीमेंटेशन होगा।

**शानु गोहिल :-**

वह इम्प्लीमेंटेशन कब करते है। आज जेसल पार्क मे गये पंधरा सालो से टॉवर्स को तरलीफ है। विषय मंजुरी केलिए आया। मंजुरी देने के बाद कॉन्ट्रॅक्टरो काम भी दे दिया। लेकीन दो साल हो गये अभी तक काम चालू नही हुआ। तो यह लोग किस लिए मंजुरी लेते है। श्री, बारकुंड साहब को खुलासा करने के लिए बोलीए। कॉन्स्ट्रॅक्टर को बुलाकर बोलते है की, काम चालू करो। वो काम चालू करता नही । इसमे क्या राजनीती है यह हमे मालूम पडे।

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

मंजुरी मिळालेली आहे. मा. स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे.

**शानु गोहिल :-**

आपल्याला मंजुरी कधी दिली होती?

**शिवाजी बारकुंड :-**

आत्ता इथे माझ्याकडे पेपर नाहीत. परंतु, ऑर्डर दिलेली आहे. मध्यंतरी  मा. आयुक्त साहेबांनी असे सांगितले होते की, पावसाळ्यामध्ये रस्ते खोदू नका. ज्या ठिकाणी, या केसमध्ये मेन रोड असतील तिथे करू नका. ही इंटरनल बाब आहे. मी ठेकेदारांना कालच फोनवर सांगितलेले आहे की, ताबडतोब ते काम चालू करा. तिथे आज पाईप पडतील आणि ते काम चालू करतील.

**शानु गोहिल :-**

साहब आज कम से कम १५-२० दिनोंसे बारीश बंद है। यह टेंडर निकाल कर २-३ महिने हो गये। लेकिन काम ही चालू नही कर रहै। उसका खुलासा किजीए वो क्या राजनिति कर रहे है।

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही तर म्हणता की, मा. आयुक्तांचे आदेश होते मग हे कसे काय झाले? तीन मिटींग पहिले तुम्ही सांगितले होते की, फायर हायड्रेनचा प्रस्ताव पुढच्या मिटींगला येईल. मा. आयुक्त साहेब, तुम्ही यांना आदेश दिले होते. अडचण काय आहे?

**शिवाजी बारकुंड ;-**

फायर हायड्रेनबाबतचा सगळा सर्व्हे पुर्ण झाला आहे. आपली चर्चा झाली की, गॅस गोडाउनचे घेतले आहे का? नव्हते घेतले ते आता घेतले आहे. पुढच्या मिर्टींगला ते येणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुमचे आदेश होते की, जे काही आहे ते पुढच्या मिटींगला आले पाहिजे. तुमचे उर्वरित काम होते ते द्यायचे होते.

**शानु गोहिल :-**

श्री. बारकुंड साहेब, माझा एक प्रश्न राहिला. चौपाटी पर जो अभी आमदार फंडसे जॉगर्स पार्क बना हे। वहापर जो लॉन लगायी जा रही है वह घास सुख रही है। उसके लिए हम लोग जो पंम्प हाऊस बना रहे है उसको आप कनेक्शन कब देंगे?

**शिवाजी बारकुंड :-**

जो कॉर्पोरेशनला स्ट्रक्चर रहता हौ, असे इमिजिएट, सेम डे कनेक्शन होता है।

**शानु गोहिल :-**

आपने उसके लिए कुछ सोचा है या नहीं? पम्प हाऊस तो ऑलरेडी बन गया। आप अनेक्शन कब देंगे?

**शिवाजी बारकुंड :-**

पंप हाईस पुरा हुआ नही है।

**शानु गोहिल :-**

आप के पास बारबार आना पडेगा। हम लोगों को रिक्वेस्ट करना पडेगा। उसके बाद मिलेगा।

**शिवाजी बारकुंड :-**

आने की जरूरत नही है। कार्पोरेशन का प्रॉपर्टी है।

**शानु गोहिल :-**

आप को बार बार हर बात याद दिलाना पडता है। इस निविदा को आर्थिक मंजुरी लेकर दो साल हो गया। लेकीन आपने लोगो को कनेक्शन दिया नही ओर पानी के लिए तरसाया। आप खुद वहा पर रह रहे हो। आप उस टॉवर के बाजू मे रहते हो। आपको उस टॉवर की समस्या मालूम है। उसके बावजूद भी आप वहा पर राजनिति कर रहे हो।

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, या विषयांच्या अनुषंगानेच बोलतो. भगतसिंग उद्यान हे आपल्या महापालिकेचे उद्यान आहे. पंधरा दिवसापासून खड्डा खणून ठेवला आहे. त्याला फेरल वगैरे लावायला आपल्याकडे गोडाऊनला मटेरियल नाही. म्हणून आपल्या गार्डनला...

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. मला राजनीती...

**शानु गोहिल :-**

साहेब, आपण राजनिति करता. गेल्या दोन वर्षापासून तुम्ही त्या टॉवरना कनेक्शन दिले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या गोडाऊनची पोझीशन तुम्ही बघितली का? माझ्या वार्ड मधील सांगतो. आत्ता आम्ही एवढी सुंदर झाडे लावून घेतली. सगळा खर्च आपला त्याच्यावर होतो. माणसे, मजुर, पगार सगळे सांगतो. पंधरा दिवसापासून गार्डनला पाण्याचे कनेक्शन नाही. का, तर आपल्या गोडाईनमध्ये अर्ध्या इंचाचा पाईप नाही. ही गोडाउनची पोझीशन आहे. गोडाऊनचे स्टॉक रजिस्टर मागवा.

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्या गोडाऊन मध्ये आपण आजपर्यंत जी.आय.ची फिटींग घेतलेली नाही. आजपण आपण घेत नाही. जी.आय.फिटींग ज्या ज्या ठिकाणी करायची असते त्याचे कोटेशन एस्टीमेट होते. काम होते. बाकी आपल्या स्टोअरला....

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा, तुमचे हे उत्तर संयुक्त आहे का? आत्ता ही बिल्डींग आहे. त्याचा एक पाईप फुटला. तुम्ही त्याचे टेंडर काढणार आहात. तुमच्या गोडाऊनला पाच-पंचवीस हजाराचे सामान ठेवायला नको का? हे काय उत्तर झाले? आज पर्यंत काहीच झालेले नाही. तुमचे म्हणणे काय, घ्यायचे नाही का? मी काय विचारतो त्याचे उत्तर द्या. मागच्या वेळेला भाईंदर सेकंडरी शाळेच्या समोरची शाळा. संपूर्ण चारही फ्लोअरला पाण्याचे कॉक तुटलेले होते.सहा-सहा महिन्यांपासून मुलांना प्यायला पाणी मिळत नव्हते. त्याचे हेच उत्तर की, आमच्या गोडाऊनला नाही म्हणून आम्ही लावणार नाही. आत्ता दहा नळ बसवायचे तुम्ही टेंडर काढणार आहात काय? तुमचे एक संयुक्त टेंडर काढायला तुम्हाला काय होते?

**अनिल सावंत :-**

सर्व म्युनिसीपालीटी शाळांची हीच परिस्थिती आहे.

**मा. आयुक्त ;-**

मटेरियल खरेदी करून ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

मी तेच बोलतो की, तुम्ही स्टॉक रजिस्टर तयार करा.

**अनिल सावंत :-**

तुमच्या अधिकारात अवलोकनामध्ये मागवा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्याच्या खुलासा झाला पाहिजे, फायर हायड्रोजनचे काय झाले? तुमच्या आदेशांना पायमल्ली झाले आहे.

**मा. आयुक्त :-**

पुढच्या मिटींगला देतो.

**मिलन म्हात्रे :-**

आणि झाले नाही तर? कारण तीन मिटींग गेल्या.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, हा जो ५० नंबरचा विषय आहे. त्याचे बजेट प्रोव्हीजन काय आहे? तुम्ही स्टँडीग कमिटीमधून आर्थिक आणि प्रशासकिय मंजुरी घेता..

**शिवाजी बारकुंड :-**

बजेट प्रोव्हीजन आहे.

**अनिल सावंत :-**

आहे मग इकडे लिहायला सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, कुठलाही प्रस्ताव बजेट प्रोव्हीजन असल्याशिवाय मा. स्थायी समितीपुढे येऊ शकत नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब, हे तुम्ही म्हणता. जेव्हा तुम्ही तुमचा गोषवारा देता त्याच्यामध्ये लिहा की, ५० लाखाचे प्रोव्हीजन होते त्याच्यामध्ये आजपर्यंत एवढे खर्च झाले. आत्ता हे एवढे खर्च करणार. हा जो १ नंबरचा विषय आहे, गणेश देवल नगर. त्याच्यापूर्वी आपण ही जलवाहिनी कधी टाकली होती. की, आपण नवीन टाकत आहोत?

**मिलन म्हात्रे :-**

बहुतेक सगळ्या झालेल्या आहेत आणि आत्ता नवीन अतिक्रमण चाले आहे त्याच्याकडे ही प्रोव्हीजन आहे. साहेब, तुम्ही माझ्या बरोबर फिरायला चला. हा विषय तुम्ही राखून ठेवा. मी त्या वॉर्डचा नगरसेवक होतो.

**अनिल सावंत :-**

आपण ही लाईन पहिली कधी टाकलेली?

**शिवाजी बारकुंड :-**

ही पूर्वीची फार जुनी लाईन आहे,

**अनिल सावंत :-**

साधारण किती वर्षे ?

**शिवाजी बारकुंड :-**

२००० च्या आसपास असेल.

**अनिल सावंत :-**

२००० म्हणजे नऊ वर्षामध्ये लाईन खराब कशी होते?

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, लाईन खराब नाही. फक्त पाणी पुरवठा कमी होतो. पाणी पुरठा व्यवस्थित होत नाही. म्हणून आणले आहे.

**अनिल सावंत :-**

मला एक सांगा, तिथे जर आपण त्या पाईपलाईनचे क्लीनींग केले. तर पाणी पुरवठा सुरळीत होऊ शकता का? म्हणजे हे ३५ लाख खर्च करण्यापेक्षा..

**शिवाजी बारकुंड :-**

आहे याच्यामध्ये पाणीपुरवठा सुरळीत होऊ शकत नाही. हा प्रस्ताव आपण मा. स्थायी समितीपुढे दिलेला आहे. मा. स्थायी समितीने यावर विचार विनीमय करून मंजुर किंवा नामंजुर करावे.

**अनिल सावंत :-**

हा विषय तसा नाही. शहराच्या विकास कामांमध्ये आम्हाला कोणताही रोख आणायचा नाही. पण मला एक सांगा, २००० साली पाईपलाईन टाकलेली आहे, ती एवढ्यातच खराब झाली.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, खराब झाली नाही. पाईपलाईन कमी डायमीटरची. तिथे पाणी जात नाही. त्या पूर्ण एरियाचे हायड्रोलीस केलेले आहे. म्हणून हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला कोण बोलते? मी त्या वॉर्डचा नगरसेवक होतो. पाईपलाईन ही आता २००६ ला मी, मंजुरी करून घेतलेली आहेत. त्या वेळेला पत्र वगैरे देऊनसुध्दा तुम्ही जाणूनबुजून इलेक्शनच्या अगोदर कामे केलेली नाहीत. आणि या वर्षभरामध्ये तिकडे पाईपलाईनची कामे झालेली आहेत. तुमचे एकही टेंडर निघालेले नाही. जाउन बघा, सगळे रस्ते मोकळे झाले आहेत. हे सभागृहाला काय माहिती देतात? ही पाईपलाईनची प्रोव्हीजन, साहेब याच्या पुढे त्या ठिकाणी जेवढी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत आणि आपल्या वॉर्ड ऑफीसर लोकांना तक्रारी करून सुध्दा तोडली नाहीत. त्याची प्रोव्हीजन आहे. मी त्या वॉर्डाचा नगरसेवक होतो. सगळ्या गल्ली-गल्लीमध्ये पाईपलाईन टाकलेल्या आहेत. त्याच्या नंतरची गोष्ट करतो. या ठरावाला आमचा विरोध आहे. आमचा विरोध नोंदवून घ्या आणि मग काय करायचे ते आम्ही करू.

**मा. सभापती :-**

तुमचा विरोध नोंदवून घेतो.

**अनिल सावंत :-**

थांबा आम्ही ठराव देतो.

**ध्रवकिशोर पाटील :-**

विषय असा आहे की, ही जी पाईपलाईन टाकायची आहे ही नवीन टाकायची नाही. तिथे ऑलरेडी पाणी कमी येत म्हणून आपण ती टाकतो आहे.

**अनिल सावंत :-**

मला तेच तर रिपोर्टींग पाहिजे. २००० सालची........

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

२००० साल की बात करते है। आज २००९ चल रहा है। कितने आदमी बढ जाते है वह मालुम है।

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही फिरता का? मी फिरतो. फोटोपास चेक करा, तिकडे काय उद्योग चाले आहेत ते तुम्हाला कळेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, झोपडपट्टया तोडणे हे काम पालिकेचे आहे, आपले नाही. अतिक्रमण झाले असेल ते त्यांनी तोडले पाहिजे.

**मा. सभापती :-**

ते आपलेही नाही ते सेंट्रल गव्हर्नमेंटच ते आपल्या हद्दीत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ते सेंट्रल गव्हर्नमेंटचे नाही. सर्व्हे नंबर ७७२, ती जागा कलेक्टरची आहे.

**मा. सभापती :-**

आपल्या हद्दीत येत नाही. ते सेंट्रल गव्हर्नमेंटचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सेंट्रल गव्हर्नमेंटचे आहे. मग तिकडे पाईपलाईन कशाला टाकता?

(सभागृहात गोंधळ)

**ग्रिटा फॅरो :-**

पाईपलाईन पहिल्यापासून आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ती पहिल्यापासून पाईपलाईन नाही. २००७ ला पाईपलाईन टाकली आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

पाणी कमी येते.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता आमच्या वॉर्ड मध्येपण पाणी कमी येते म्हणून तुम्ही पाईपलाईन बदलणार का?

**हेलन गोविंद :-**

उत्तनला पाणी कमी येते, मग त्याचे काय? किती वर्षे झाली आम्हाला उत्तनला पाणी मिळत नाही..

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा, हे उत्तनचे २ नंबरला आमचा विरोध नाही. त्यांनी तिकडे स्पष्ट लिहिले आहे की, सिमेंटची पाईपलाईन बदलून तिकडे भिडाची पाईपलाईन टाकायची आहे.

**टेरी परेरा :-**

आमची सिमेंटची आहे.

**हेलन गोविंद :-**

आमची सिमेंटची आहे. आम्हाला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यात आमचा विरोध नाही. तुम्ही क्लीअरकट दिले आहे की, ही बदलून नवीन टाकायची आहे.

**हेलन गोविंद :-**

कारण आम्हाला किती वर्षे झाली पाणी येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही ठरावच घेतो. मा. आयुक्त साहेब, हा तीन नंबरचा विषय काय लिहिला आहे ते बघा. सगळ्यांनी ऐकून घ्या. महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टॅंकरचा प्रति फेरा दर निश्चित करणे, त्या फेऱ्याचे तुम्ही काय लिहिले आहे? हे किती आहेत? तुम्ही पन्नास लाख रूपये प्रति फेरा दर देणार का? म्हणजे तुम्ही दर निश्चिती करता. मग त्या दराचे काय? आम्हाला दर पाहिले की नाही? टॅंकरला हजार देता, पाचशे देता, दिडशे देता, दोन हजार देता? पन्नासवर बोलतो.

**शिवाजी बारकुंड :-**

अंदाजीत रक्कम आहे. ते पुर्ण वर्षाचे टेंडर आहे. आर्थिक मान्यता झाल्यावर निविदा स्टॅंडींग कमिटीपुढे ठेवण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही असे लिहिले आहे का?

**अनिल सावंत :-**

बारकुंड साहेब, टॅंकरचा प्रति फेरा दर निश्चित करणे. दर निश्चित करा.

**शिवाजी बारकुंड :-**

प्रती फेरा दर निश्चित करायचा आहे. याला जी वार्षिक बजेट तरतुद आहे. ती ५० लाखाची आहे. मा. स्थायी समितीची आर्थिक मंजुरी मिळाल्यानंतर याचे टेंडर होणार. ते टेंडर परत मा. स्थायी समितीपुढे मंजुरीला येणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमची वर्डींग चुकलेली आहे. बाकी बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्हाला कामाचे योग्य वाटते का?

**जुबेर इनामदार :-**

तुमचा १ नंबरचा विषय झाला असता. त्याच्यामध्ये तुम्ही गोषवारा देताना चुकलात. तसे सांगायचे होते की, मला त्याची साईज वाढवायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आपले काय म्हणणे आहे? फेऱ्याचे दर निश्चित करतात आणि अमाऊन्ट दिली आहे.

**मा. आयुक्त :-**

फेऱ्याचा दर नाही. आर्थिक व प्रशासकिय मंजुरीसाठी आले आहे. फेऱ्याचा दर पुढच्या मिटींगला येणार.

**मिलन म्हात्रे :-**

प्रति फेरा दर निश्चित करणे ही लाईन काय म्हणते ते तुम्ही मला जरा सांगा.

**मा. आयुक्त :-**

पाण्याच्या टॅंकरने पाणी पुरवठा कामासाठी आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळावी एवढेच म्हणायला पाहिजे होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय असा पाहिजे होता, महानगरपालिकेव्दारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टॅंकरसाठी निविदा काढणेबाबत. प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**मा. आयुक्त :-**

दर निश्चिती हे काढून टाकायला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

सुधारणा करून घेण्यात यावे. ते गरजेचे आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

कमिशनर साहेब, मिरा भाईंदर मे टॅंकर कब बंद हुआ या? टॅंकरबंद ही है समझो। अब जहा पानी नही है, मतलब समाज मंदिर या कही प्रोग्राम रहेगा, तो वहा टॅंकर दिया जाता है। जिस सोसायटीं मे पानी कनेक्शन नही है और लोग रहने को आये है वहा टँकर दिया जाता है। तो यह जो मिरा भाईंदर मे जो छोटे छोटे टॅंकर घुमते है वह म्युनिसीपाल्टी का पानी कहा से देते है? छोटे छोटे रिक्शा का १००-१५० रूपया लेकर पानी देते है तो वो म्युनिसीपाल्टीका ही पानी दे रहे है। और बहोत टेम्पो रिक्षा चालू है।

**शिवाजी बारकुंड :-**

जे खाजगी छोटे टॅंकरवाले बोलतात की म्युनिसीपाल्टीचे पाणी आहे. त्यांचा धंदा करण्यासाठी लोक बोलतात. माझ्याक़डे दहा तक्रारी आल्या आहेत मी दोन लोकांबरोबर समक्ष गेलो दाखव कुठून म्युनिसीप्लाटीचे पाणी भरले. साहब, हम तो बोलते है, हमारा अच्छा बावडी का पानी हम बेचते है, लोगो को म्युनिसिपाल्टी का पानी बोलके है। म्युनिसीपाल्टीचे फक्त हे मोठे टॅंकर, ज्या ठिकाणी लाईन गेलेली नाही. धार्मिक कार्यक्रम मसतात. त्या ठिकाणी आपण टॅंकर देतो. छोटे टॅंकर हे म्युनिसीपाल्टीकडून दिले जात नाहीत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

श्री. बारकुंड साहब, हो सकता है आपको जानकारी नही हो। हम लोग २४ घंटे एरिया मे रहते है। हम जो बोलते है वो सुनकर आप एन्क्वायरी किजीए। म्युनिसीपाल्टी के टॅंकर से यह लोग अपने दुकानो मे, मेरे वॉर्ड मे एक दुकान मे दस हजार लीटर का टाकी बिठाया है। म्युनिसीपाल्टी के जो टॅंकर भाडे चलते है वह इसमे जाकर खाली करते है। और वह बेचने का धंदा करते है। कमिशनर साहब, हम लोग बोल रहे है तो पुरावे के साथ बोल रहे है। झुठ नही बोल रहे या किसी को गुमराह नही कर रहे है, ऐसा है।

**शिवाजी बारकुंड :-**

परत एखादा सन्मा. सभागृहाला सांगतो, माझ्याकडे पण अशा काही तक्रारी आल्या की, म्युनिसाल्टीचे छोटे टॅंकर १००-१५०, म्युनिसीपाल्टीचे पाणी बोलतात. मी दोन-तीन लोकांना सांगितले की, मी तुमच्याबरोबर आता येतो आणि मी गेलेलो आहे. उदाहरण सांगतो, मी केबीन रोडला रामगोपाल सदनच्या पुढे गेलेलो आहे. एका नागरिकांनी फोन केला होता. तरी मी स्वतः जाऊन आलो. म्युनिसीपाल्टीचे पाणी कुठून भरले ते तू दाखव, ते बोलतात की, आम्ही आमच्या बावडीचे पिण्यासारखे पाणी, लोकांना ते सांगतो की, म्युनिसीपाल्टीचे पाणी. परत एकदा सांगतो की, आपले पाचही टंकर पॉईंट दोन वर्षे झाले पूर्ण बंद आहेत. फाटकावरूनच एका ठिकाणावरून टॅंकर जातात. आणि त्या ठिकाणावरून पावती फाडून ज्या बिल्डींगला पाणी नाही, धार्मिक कार्यक्रम आहेत अशा ठिकाणीच जातात. आणि छोटे टॅंकर बिलकुल जात नाहीत. तरी माझी परत सभागृहाला विनंती आहे की, जर टॅंकरबाबत असे असेल तर पूर्ण टॅंकर बंद करा. तो विषय पण संपून जाईल.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

आपले टॅंकर त्या छोट्या टाकीमध्ये पाणी टाकतात असे त्यांचे म्हणे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मी तुम्हाला सांगतो. आपल्या गणेश देवल नगरला पण से सिस्टम आहे. एक टॅंकर येतो, खाली करतो. आ्णि मग त्या टॅंकरने पाणी विक्री करतात. पण तो बावडीचा टॅंकर आहे. पिण्याच्या पाण्याचा त्याच्यात काही संबध नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, हम लोग यहा चर्चा कर रहे है, इसका मतलब हम किसीको गुमराह नही कर रहे है।किसी आरोप नही कर रहे है। जो सच्चाई है वो सामने रख रहे है। तो उसको सुनकर आपको आगे एन्क्वायरी करके कार्यवाही करना चाहिए। हमारे कहने का मतलब यह नही की, टॅंकर बंद करो। लेकीन इसका मिसयुज करके लोग धंदा कर रहे है, वो बंद होना चाहिए।

**मा. आयुक्त :-**

जिथे पाण्याचे वाटप आहे आणि ज्या सोसायटीने पैसे भरलेले आहेत तिकडेच द्या. दुसरा कोणी टॅंकरवाला, आपला टॅंकरवाला जर भरून देतअसेल. तर त्याच्यावर कार्यवाही करा.,

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, मंदिर आणि मशिदीमध्ये टॅंकरची गरज लागते. पाण्याची गरज भासते. तोही विषय गरजेचा आहे. काय असेल त्याची श्री. बारकुंड साहेबांना दक्षता घ्यायला सांगा.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती आहे, ५० नंबरच्या विषयावर आत्ता जो ठराव झालेला आहे. विकासकामांना आमचा कुठेही विरोध नाही. पण प्रशासनाने जी माहिती दिलेली आहे ती अपुरी आहे. तर १ नंबरसाठी तुम्हगी स्वतः जातीने चौकशी करून त्याचा डिटेल रिपोर्ट पुढच्या मिटींगमध्ये ठेवा. नंतर आपण त्याला मंजुरी देऊ.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचे मोजमाप घ्या. पाईपलाईन कुठे चालली आहे? कारण आम्हाला माहिती आहे. सगळी पाईपलाईन पडलेली आहे.

**अनिल सावंत :-**

आपण देऊन टाका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही ठराव पास केला आहे. बाकी तुम्ही एन्क्वायरी करा.

**अनिल सावंत :-**

तुम्ही एन्क्वायरी करा. बाकी हे खालचे दोन पास करा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, सुचनेसह ठराव मंजुर आणि आमच्या सुचनेची नोंद घ्या. त्यामध्ये लिहा. हा ५० लाखांचा प्रश्न आहे.

**प्रकरण क्र. ५० :-**

आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ४३ :-**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर मनपा क्षेत्रातील जनता नगर रोडवरील पोद्दार हायस्कुल ते हनुमान मंदिर (गणेश देवल नगर) येथे पोलादी जलवाहिनी अंथरणे. | रू. ३९,४५,९८१/- |
| २. | उत्तन बस स्टॅंड ते लाईट हाउस परिसरात असलेली सिमेंटची जलवाहिनी बदलून बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. १३,३५,०००/- |
| ३. | महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टॅंकरच्या प्रति फेरा दर निश्चित करणे. | रू. ५०,००,०००/- |

उपरोक्त कामांकरिता महानगरपालिकेच्या सन २००९-१० च्या वार्षिक अर्थसंकल्पात विविध लेखशिर्षाअंतर्गत तरतुद करण्यात आलेली आहे. सबब सदर कामास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. हेलन गोविंद          अनुमोदक :- श्री. टेरी परेरा**

**सदर ठरावात श्री. अनिल सावंत यांनी पुढील प्रमाणे सुचना मांडली.**

५० नंबरच्या विषयावर आत्ता जो ठराव झालेला आहे. विकासकामाला आमचा विरोध नाही. पण प्रशासनाने जी माहिती दिलेली आहे ती अपुरी आहे. यातील १ नंबरसाठी मा. आयुक्त यांनी जातीने चौकशी करून याचा डिटेल रिपोर्ट पुढच्या सभेमध्ये ठेवावा नंतर आपण त्याला मंजुरी देउ. बाकीचे खालचे दोन्ही पास करा.

**सदर ठरावास श्री. मिलन म्हात्रे यांनी विरोध दर्शविला.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५१, कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**शानु गोहिल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) प्रभाग क्र.३३ अनुसुचित जाती करीता राखीव प्रभाग आहे. शासनाच्या दलित वस्ती सुधारणा योजेने मार्फत "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नव बौध्दासाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसुचित जातीच्या राखीव प्रभागा शिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०ऽ किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नमूद करण्यात आलेली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील" अशी तरतूद आहे. प्रभाग क्र.३३ येथे खालील कामे करण्याबाबत अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) प्रभाग क्र.३३ येथील अंतर्गत रस्त्यावर व फुटपाथ करीता पेव्हर ब्लॉक बसविणे व आवश्यक इतर कामे करणे. | रु.५०,००,०००/- |
| २ | भाईंदर (प.) जनार्दन रकवी रस्ता उंच करुन डांबरीकरण (पूर्नपृष्टीकरण) करणे. | रु.४७,९८,४००/- |

वरील कामाकरीता संपूर्ण रक्कम दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी करण्यात यावी. सदर कामी महानगरपालिकेचा काहीही खर्च होणार नाही. त्यामुळे सदर अंदाजपत्रकाना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझी सुचना अशी आहे. मागच्या वेळेला आपण जेव्हा माशाचा पाड्याला त्या शाळेला मंजुरी दिली. त्यावेळेला तुम्ही ह्या दलित वस्तीचा हा विषय आणला होता. त्याच्यातील काही निधी तुम्ही भविष्यात मिळणाऱ्या दलित वस्तीकरिता जो निधी मिळणार आहे, असे तुमचे इकडेच झाले होते. आम्ही चर्चा करत असताना कुठल्याही अधिकाऱ्याने डिस्टर्बन्स टाकायचा नाही. संपल्यावर काय करायते ते तुम्ही करा. साहेब, तुम्ही असे बोलले होतात की, आपण हा निधी तिकडे सुध्दा वर्ग करू. मला विरोध नाही, हे सांगून ठेवतो. पण सुभाषचंद्र बोस मैदानाच्या नाक्यावर पाच महिन्यापूर्वीपासून सन्मा. माजी महापौर सौ. निर्मला सावळे यांचा फर्स्ट क्लासचा एक बॅनर आहे. अजूनही तो तिकडे आहे. कोणीही काढलेला नाही. त्याच्यावर पेव्हर ब्लॉकचे काम सुरू झाल्याचे अभिनंदन करण्याचे बोर्ड आहेत. अजून जाऊन कोणीतरी माणूस पाठवा. फोटो काढून बोलवा. मग तो बॅनर खरे बोलतो की, हे काम खरे बोलते ते सांगा कारण तिथे किती एरिया आहे हे मला माहिती आाहे. मेन रोडच्या फुटपाथचे तुम्ही एक निराळे टेंडर काढणार. तोच फुटपाथ त्या प्रभागामध्ये आहे, म्हणून या दलित वस्तीचेपण टेंडर काढणार. तो फुटपाथ आहे किती? ५० लाख म्हणजे, काय झाले? आतमध्ये रस्ते नाहीच. तुम्ही पेव्हर ब्लॉक बसवूच शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पेव्हर ब्लॉक अडीच इंचे असते. आणि ते अडीच इंच लावल्यानंतर झोपडपट्टी आणि परिसर खाली होईल. म्हणजे रस्ता वर आणि झोपड्याखाली.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मला एक सांगा, तुमचे मेन रोडचे काम निघाले. आत्ता आपल्या राष्ट्रपती मॅडम आल्या होत्या. तेव्हा रंगरंगोटी, मेन्टेन्स अमुक, तमुक सगळे झाले ना? कामाला विरोध नाही, परत सांगायाचे जे ५० लाख पुढे टाकायचे आहेत. साहेब, त्या समाज मंदिराची दुरावस्था जाऊन बघून या. ते जरा रिनोव्हेट करा.

**अनिल सावंत :-**

मुले शाळेमध्ये बसतात. तिथे फार भयानक परिस्थिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हाच पैसा तुम्ही त्या वॉर्डमध्ये इतर कामांना चांगल्यापैकी लावा. तुम्ही फक्त एक ठेवले त्या व्यतिरिक्त काही करता येणार नाही. हे जे तुम्ही बोलले आहात. फुटपाथकरिता पेव्हर ब्लॉक बसविणे तसेच या समाजाच्या हिताची जी काही अन्य सर्व कामे असतील ती करणे. याच्याकरिता तुम्ही ५०लाखाचा निधी ठेवा. आणि मा. जिल्हाधिकाऱ्यांना तो प्रोजेक्ट रिपोर्ट फाईल करा की, समाज मंदिर सोडवायचे आहे. आत्ता तुमचे कुस्तीचे होते ते ह्या कामात होईन जाईल. ते त्या वॉर्डमध्येच आहे. मागे कुस्ती करिता रिन्युएशनचे, त्याच्या बाहेर एक मंडप आहे त्याच्या बाहेर तुम्ही पेव्हर ब्लॉक लावू शकता. आणि पेव्हर ब्लॉकचे मेजरमेंट घ्या. ५० लाख म्हणजे किती झाले, टू मच. आणि त्यापैकी काही रक्कम आदिवासी शाळेकरिता वर्ग करता आली तर ती रक्कम थोडी वर्ग करा.

**दिपक खांबीत :-**

रस्त्याचे जे पेव्हर ब्लॉक आहेत ते सव्वा दोन लाखाचे आहेत. बाकीचे आतले रस्ते आहेत, भोलानगर व आंबेडकर नगर ही मोठी झोपडपट्टी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा माणसांमध्ये भांडणे लावू नका. इथे वसलेल्या प्रत्येक नगरसेवकाच्या वॉर्डमध्ये झोपडपट्टया आहे. मग तुम्ही सगळीकडे पेव्हर ब्लॉक लावणार आहत का? आत्ता सी.सी.ची. कामे काढली. तुमची विषयपत्रिका काय बोलते? मग माझ्या वॉर्डमध्येपण सगळीकडे लावून टाका. उद्या त्या क्रांती नगरला लावायचे असेल तर तुम्हाला दहा करोड रूपये कमी पडतील. आत्ता झोपडपट्ट्यांमध्ये आरसीसी चे सिमेंटचे रस्ते बनवणार. नंतर परत पेव्हर ब्लॉक बसवणार. त्या काशिमिऱ्याला श्री. गुलाम रसुल पटेल यांचा टॉवर पाडला आहे. तिकडे जाऊन केवढ खड्डे हेते बघा तिकडे पेव्हर ब्लॉक बसवायचे आहेत. अशा ठिकाणी पेव्हर ब्लॉकचे मिनींग ते आहे. आत्ता खड्डे केवढे आहेत. दर पावसात त्या डोंगरावरचे पाणी उतरते आणि आपला सगळा मेन रस्ता बुडून जातो.

**मा. आयुक्त :-**

साईट बघून येतो आणि कलेक्टरला प्रस्ताव पाठवतो.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच वॉर्डमध्ये स्मशानभूमी सुध्दा आहे. स्मशानभूमीचे पेव्हर ब्लॉकचे काम आत्ता तुम्ही काढले आहे. तो फंड तुम्ही याच्यातून घेऊ शकता.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तो फंड आमदार निधीमधून १० लाख रूपये दिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

तुमचे म्हणणे बरोबर आहे. स्मशानभूमीतपण घालू शकतो.

**मिलन म्हात्रे :-**

मी तुम्हाला भाईंदर वेस्टचे बोलतो.

**शानु गोहिल :-**

भाईंदर वेस्ट का किया है।

**मिलन म्हात्रे :-**

ते आम्हाला माहिती नाही. यांनी तसे केलेले नाही. पण जमत असेल तर तुम्ही ते सर्व करून बघा. फक्त विशिष्ट एका कामाकरिता....

**मा. आयुक्त :-**

यामध्ये बाकीची कामेपण ॲड करून काय करता येईल ते बघून कलेक्टरकडे प्रस्ताव पाठवतो.

**मिलन म्हात्रे :-**

आणि त्या शाळेचेपण तिकडे घाला.

**अनिल सावंत :-**

त्यामध्ये आत्ता तो झोपडपट्टी एरिया आहे. त्याच्यामध्ये महिलांसाठी किंवा इतर सुशिक्षित बेरोजगारांसाठी आपल्याला काय करता येईल ते पण बघा.

**मिलन म्हात्रे :-**

बजेट मध्ये आपली किती प्रोव्हीजन आहे?

**अनिल सावंत :-**

बजेट नाही. तो राज्य शासनाचा निधी आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. जिल्हाधिकारी, समाजकल्याणकडून जेवढा फंड ....

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या बजेटमध्ये दलित वस्तीकरिता लेखाशिर्ष काय म्हणते?

**मा. आयुक्त :-**

महापालिकांना गव्हर्नमेंट एक कोटी पर्यंत देते.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या बजेटमध्ये आपण काय तरतुद केली आहे?

**मा. आयुक्त :-**

एक कोटीची.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे ही तरतुद आहे?

**अनिल सावंत :-**

१ कोटी आहे पण ती शंभर टक्के राज्य शासनाकडून मिळेल.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता तुमची ती तरतुद किती खर्च झाली?

**अनिल सावंत :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

कशी नाही.

**अनिल सावंत :-**

पैसे आलेच नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला तुम्ही शाळेचा ठराव पास केला.

**अनिल सावंत :-**

मग ती शाळेची कामे कुठे आली.

**मिलन म्हात्रे :-**

माशाच्या पाड्याच्या शाळेचा तो ठराव पास झाला. आणि तुम्ही बोलले होते की, दलित वस्तीच्या ग्रॅण्डमधून हे पैसे खर्च केले जातील. आत्ता या ठरावाला तीन महिने झाले.

**दिपक खांबीत :-**

ते दलित वस्तीमध्ये बसत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

का बसत नाही. आदिवासी दलित वस्तीमध्ये येत नाहीत.

**अनिल सावंत :-**

नाही. शेड्युल कास्ट

**दिपक खांबित :-**

नवबौध्द आणि एस.सी.

**मिलन म्हात्रे :-**

तिक्रडे ते पण समाज आहेत. मागच्या वेळेला तो  प्रभाग होता.

**अनिल सावंत :-**

५० टक्के पाहिजेत.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला तो प्रभाग होता.

**मा. आयुक्तः-**

तो प्रभाग शेड्युल ट्राईबसाठी होता.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्या अगोदर दलित वस्ती.

**मा. आयुक्त ;-**

शेड्युल कास्ट साठी नव्हता.

**मिलन म्हात्रे :-**

सौ. निर्मला सावळे ज्या वॉर्डमधून निवडून आल्या तो राखीव प्रभाग होता.

**दिपक खांबीत :-**

माशाचा पाडा हे जनता नगरमध्ये येते.

**मिलन म्हात्रे :-**

दलित प्रभागाचे से काही स्पेसिफीक आहे की, तो प्रभाग आहे तिकडेच खर्च करायचा?

**दिपक खांबीत :-**

प्रभाग किंवा जिकडे अनुसूचित जाती आणि नवबौध यांची लोकसंख्या ५० टक्के....

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे घोडबंदर वगैरे सगळे येईल ना? घोडबंदरला सौ. निर्मला सावळे ज्या प्रभागातून निवडून आल्या तो प्रभाग आहे ना? तो रिझर्व्ह होता.

**मा. आयुक्त ;-**

ती रक्कम आदिवासी विभागाला पण मागवू आणि त्याला पण मागवू. दोन्हीकडे मागवू.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, याच अनुषंगाने एक विषय आहे. इथे आपल्याला १०० टक्के राज्य शासनाचे अनुदान मिळते आहे. तरी सुध्दा हा विषय स्टँडींग समोर आला. म्हणजे कोणतेही धोरणात्मक आणि आर्थिक निर्णय महापालिकेशी निगडीत घ्यायचे असतील, तर ते सर्व विषय स्टँडींगसमोर यायला पाहिजेत असे संकेत आहेत. एमएमआरडीए च्या माध्यमातून आज शहरामध्ये जवळ-जवळ २५० सुलभ शौचालयाचे बांधकाम चालू

आहे. याला १०० टक्के अनुदान एमएमआरडीए चे आहे पण तेच जे बांधकाम आहे ते महानगरपालिकेच्या माध्यमातून होते आहे. महानगरपालिका त्याला पेमेंट करते. म्हणजे एमएमआरडीए देते, नंतर महानगरपालिका देते. आज ह्या सुलभ शौचालयांविषयी बऱ्याचशा तक्रारी आहेत. त्या ज्या जागेवर प्रस्तावित केलेल्या आहेत, बांधकाम होत आहे. त्याविषयी तक्रारी आहेत. त्या बांधकामा विषयी तक्रारी आहेत. पण त्यातला कुठचाही विषय, वास्तविक हा विषय स्टॅंडिंगसमोर यायला पाहिजे होता. तो अजूनपर्यंत आलेला नाही याचे कारण काय? की, पुढे तुम्ही तो आणणार आहात? आणि अशा सुलभ शौचालयांची बांधणी झालेली आहे ती किती कम्पलीट झालेली आहे? किती प्रोसेसमध्ये आहे? त्याची सविसतर माहिती स्टॅंडींगसमोर यायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सभापती साहेब, या दोन वर्षापूर्वी एमएमआरडीए चे निर्मल अभियान सुरू केले. त्यावेळेला प्रत्येक महापालिकेत ज्यांच्याकडे संडास नाहीत त्यांच्याकडे सुलभ शौचालय बांधावे, म्हणजे हगणदारी मुक्ती योजना राबविण्यासाठी ही योजना होती. दरवर्षी महापालिका दोन तीन ठिकाणी बारा सीट, पंधरा सीट, सोळा सीट असे बांधत होते. महापालिकेला एकाच वर्षी तीन-साडे तीन हजार सीट बांधणे शक्य नव्हते. म्हणून गव्हर्नमेंटने असा निर्णय घेतला की, ज्या-ज्या महापालिकांची मागणी येईल ती मागणी नोंदवून घ्या. आणि तिथूनच मंजुर करा. आत्ता जेवढ्या सीट मंजुर झाल्या तेवढे कॉन्ट्रॅक्टरपण तिकडूनच पाठवले. फक्त आलेल्या लोकांकडून आपण काम करून घ्यायचे आणि त्या कामाचा एमबी रेकॉर्ड करून आपण द्यायचा. आपण स्टॅंडींग कमिटीमध्ये टेंडर आल्यानंतर मंजुरीसाठी ठराव ठेवतो. किंवा पैसे आल्यानंतर आर्थिक प्रशासकियसाठी ठेवतो. त्यांचे एस्टीमेंट मंजुर आहे. त्यांनीच टेंडर काढले. त्यांनीच एजन्सी फीक्स केली. आमच्याकडे फक्त सुपरव्हीजन ठेवलेले आहे. म्हणजे टेंडरपण आपण काढाययचे नाही. आर्थिक प्रशासकिय मंजुरीपण त्यांनीच दिलेली आहे. फक्त आमच्याकडे सुपरव्हीजन ठेवलेले आहे. जेवढ्या सीट तयार झाल्या, आमच्याकडे पहिल्या फेजमध्ये ५६ आणि नंतर ९८ असे २९९० सीट झाल्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, एखादी दुर्घटना घडली आणि जिवीतहानी झाली तर त्याची लायबीलीटी कोणावर?

**मा. आयुक्त :-**

त्यांच्याकडून एमएमआरडीए ने ॲग्रीमेंट केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला काय काम दिले आहे?

**अनिल सावंत :-**

कारण पेणकरपाड्याला सेफ्टी टॅंकरमध्ये मुलगा पडला होता.

**मिलन म्हात्रे :-**

तो अपघात. चालू असताना जर समझा याच्यामध्ये उद्या काही झाली, जसे भिवंडीला अख्खे कोसळले काही जिवीतहानी झाली तर लायबीलीटी कोणाची? आपल्या महापालिकेचा त्याच्यात काय पार्ट आहे?

**मा. आयुक्त :-**

महापालिकेचे सुपरव्हिजन आणि एमबी रेकॉर्ड करून पेमेंट करायचे आणि तो जीआर काढून त्यांनी डेसीग्नेशन केलेले आहे. त्यामध्ये महापालिकने काय-काय. करायचे आहे. म्हणजे कुठल्याही एम.एम.आर रिजन मधील महापालिकेच्या बॉडीपुढे आत्तापर्यंत कुठलाही विषय आलेला नाही. त्यांनी फक्त सांगितले आहे की, आम्ही टेंडर मंजुर करणार. आम्ही आर्थिक प्रशासकिय मंजुरी देणार. ॲग्रीमेंट आम्ही करणार. फक्त तुम्ही सुपरव्हिजन करायचे आणि त्यांचेच अधिकारी ते चेक करायला येतात. त्यांनी सांगितल्यानंतर आपण पेमेंट करतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आत्ता हे विश्लेषण दिले. आत्ता मला सांगा कामाच्या तक्रारी किंवा त्याचे कामाची जी ज्युरॅबिलीटी किंवा मजबुती म्हणतो, त्याच्यामध्ये जसे बिल्डींगला आपली प्लींथ सर्टिफिकेट दिले जातात. आज मला सांगा, आत्तापर्यंत स्टॅक्चरल रिपोर्ट किती आले? कारण या लोकांनी वर्क ऑर्डर द्यायला चार-सहा महिने घालावले. त्यांचा सब टेंडरवाला निलेश म्हणून आहे. त्याचे नाव कुठे रेकॉर्डवर आहे का?

**मा. आयुक्त :-**

नाही

**मिलन म्हात्रे :-**

परमार नावाची व्यक्ती मुंबईला बसली आहे. आत्ता परवा त्यांच्याकडची काही माणसे आली. त्यांना म्हटले मला परमारचा जरा मोबाईल द्या. त्यांनी सांगितले की, नाही. आम्हाला आदेश आहेत कोणाला मोबाईल द्यायचे नाहीत. आत्ता मला सांगा, माझ्या वॉर्डामध्ये किंवा अन्यत्र पण, आपल्याकडे सगळ्या मार्सी लॅंड आहेत यांनी जानेवारी ते एप्रिल पर्यंत, त्याच्यानंतर वर्क ऑर्डर द्यायला नाही पाहजे. आज अशी परिस्थिती आहे. त्या ठेकेदारांचा लॉस आहे. मी त्यांची बाजू घेत नाही. आत्ता माझ्याकडे रेडीमेक्सचे चार चार टॅंकर आले ते परत पाठवावे लागले. पोकलन परत पाठवावी लागली.

**मा. सभापती :-**

विषयावर चर्चा होऊ दया.

**मिलन म्हात्रे :-**

विषयावरच चर्चा होत आहे.

**मा. सभापती :-**

विषयावरच चर्चा होत आहे.

**मा. सभापती :**

ठराव मंजुर झालेला आहे. सचिवांनी दुसरा विषय घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, एक लक्षात तुम्ही त्या एम.एम.आर.डी.ए. च्या शौचालयाच्या विषयावर एखादी मिटींग स्वतः तुमच्या अध्यक्षतेखाली लावा. त्यांना इकडे हबालवा. कारण कोणाचा काही पायपोस नाही. आणि कामाची क्वालिटी आपले जी.इ तुम्हाला वॉर्डवाईस रिपोर्टींग करतात का?

**मा. आयुक्त :-**

करतात.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या वॉर्डचा काय केला ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

किती युनीट पुर्ण झाले? केवढे कम्लीशन?

**मिलन म्हात्रे :-**

ते नाही.

**मा. आयुक्त :-**

एमएमआरडीए चा प्रत्येक महापालिकेसाठी झोनल ऑफीसर नेमलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मुर्ध्याला ब्रीजच्या जवळचा एमएमआरडीए शौचालय बनवून तयार आहे. पेमेन्ट झाले नाही म्हणून त्याने टाळे मारले आहे. माहिती आहे? लोकांना एक्झईस्टींग संडास बंद केलेला आहे...

**मा. आयुक्त :-**

आपण करू.

**प्रकरण क्र. ५१ :-**

कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ४४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) प्रभाग क्र.३३ अनुसुचित जाती करीता राखीव प्रभाग आहे. शासनाच्या दलित वस्ती सुधारणा योजेने मार्फत "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नव बौध्दासाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसुचित जातीच्या राखीव प्रभागा शिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०ऽ किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नमूद करण्यात आलेली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील" अशी तरतूद आहे. प्रभाग क्र.३३ येथे खालील कामे करण्याबाबत अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) प्रभाग क्र.३३ येथील अंतर्गत रस्त्यावर व फुटपाथ करीता पेव्हर ब्लॉक बसविणे व आवश्यक इतर कामे करणे. | रु.५०,००,०००/– |
| २ | भाईंदर (प.) जनार्दन रकवी रस्ता उंच करुन डांबरीकरण (पूर्नपृष्टीकरण) करणे. | रु.४७,९८,४००/– |

वरील कामाकरीता संपूर्ण रक्कम दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी करण्यात यावी. सदर कामी महानगरपालिकेचा काहीही खर्च होणार नाही. त्यामुळे सदर अंदाजपत्रकाना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल** **अनुमोदक :- सौ. सुनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५२, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ठेका पध्दतीने वृक्षारोपण करणेकामी आलेल्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, माझी एक अशी सुचना आहे एक नंबरमध्ये भाईंदर (प) मुर्धा ते उत्तन विभाग ह्याच्यामध्ये जे २२०० रूपये प्रति नग दिला आहे. ते एकूण किती नग तुम्हाला बनवायचे आहेत. हजार बनवायचे आहेत? ५०० बनवायचे आहेत? २०० बनवायचे आहेत? संख्या कुठेही दिलेली नाही.

**जुबेर इनामदार :-**

हे करताना प्रभाग पद्धतीने का केले नाही? आपल्या मिरा भाईंदरमध्ये चार प्रभाग आहेत. त्या चार प्रभाग पद्धतीने केले असते तर?

**अनिल सावंत :-**

आज हा जो विषय आहे. तर वृक्षप्राधिकरणाचे कोणी अधिकारीच नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

जेवढ्या निविदा आलेल्या आहेत त्या सगळ्या कंन्स्ट्रक्शन कंपनीच्या निविदा आहेत. यांना याची काय माहिती असेल? आपल्याकडे ही कामे करायला कोणती नर्सरी उपलब्ध नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

श्री. नाईक साहेब, आत्ता याचे कॅल्क्युलेशन केले का? तुम्ही ही जी प्रपोझल आणली ओहत. माझ्या माहितीनुसार तीन वर्षापुर्वी इकडे सगळे पिंजरे लावलेले होते. आणि एकही झाड नाही आणि एकही पिंजरापण नाही.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक ठिकाणी असे म्हणून चालणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही मंजुरी देतो.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला जस्टीफिकेशन करतो.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता त्याला ५ हजार फिगर दिला आहे.

**मा. आयुक्त :-**

पाच हजार वर लावायचे आहेत, भाईंदर (प.) मुर्धा ते उत्तन.

**मिलन म्हात्रे :-**

खाली पाच हजार?

**जुबेर इनामदार :-**

साहेब, किती लावले याची नोंद कशी ठेवणार?

**मा. आयुक्त :-**

लावताना व्हिडीओ कॅसेट काढणार पेमेंट करण्यापुर्वी व्हिडीओ कॅसेट काढणार.

**जुबेर इनामदार :-**

त्याला नंबरींग द्याल का?

**मा. आयुक्त :-**

नंबर देणार ना.

**मिलन म्हात्रे :-**

आत्ता मुर्धा परिसरात जी वृक्षदिंडी निघाली, तुम्ही स्वतः गेले होते. जे वृक्षारोपण झाले, त्या रस्त्याच्या वाईंडींगच्या आतमध्ये झाले आहे.

**जुबेर इनामदार :-**

सर्व कन्स्ट्रक्शन कंपनीच्या निविदा आलेल्या आहेत. साहेब, आपल्याकडे कुठली नर्सरी उपलब्ध नाही का? ह्यांना याची काय माहिती असेल?

**मा. आयुक्त :-**

माहिती असायचे काय कारण नाही. झाडे लावायची आहेत. माहिती असायचे म्हणजे आम्ही झाडे कुठली लावायची ती ठरवून दिलेली आहेत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपल्या महापालिकेची नर्सरी पुनम सागर येथे तयार केलेली आहे. त्या नर्सरीची परिस्थिती जाउन बघा.

**मिलन म्हात्रे :-**

दोन नंबरला किती हजार लावायचे आहेत?

**मा. आयुक्त :-**

साडेसात हजार.

**टेरी परेरा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध तीन भागामध्ये ठेका पद्धतीमध्ये ठेका पद्धतीने वृक्षारोपण करणेकामी तीन वर्षाच्या निविदा मागविणेस मा. वृक्षप्राधिकरण समिती सभा ठराव क्र. २६ दि. ३०/०५/२००९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने दि. १५/०७/२००९ रोजी दै. नवभारत व जागरूक टाईम्स या वृत्तपत्रात (सार्वजनिक रस्त्यांच्या दुतर्फा महानगरपालिका निर्देश देईन त्या ठिकाणी दोन ते अडीच फुटाचे खड्डे खोदून लालमाती, शेणखत व अन्य खतांचे मिश्रण करून खड्ड्यामध्ये भरून त्यात प्रथम किमान ५ ते ६ फुट उंचीची झाडे लावणे) झाडांचे संरक्षणार्थ लोखंडी जाळ्या मनपाने दिलेल्या नकाशाप्रमाणे लावणे व झाडांची तीन वर्षे देखभाल करून झाडे जगविणेकामी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. जाहिर निविदा सुचनेनुसार मिरा-भाईंदर हद्दीमध्ये ठेका पद्धतीने वृक्षारोपण करणेबाबत खालीलप्रमाणे ठेकेदाराने आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

१) भाईंदर (पश्चिम) व मुर्धा ते उत्तन विभाग

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| १. | मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन | रू. २२२२/- प्रती नग |
| २. | मे. कल्पतरू हॉस्पीलिटी एण्ड फॅसिलिटी | रू. २३५०/- प्रती नग |
| ३. | मे. सिधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रू. २२९०/- प्रती नग |

२) मरारोड (पु.) पेणकरपाडा, मिरा गाव (फाटक ते काशीमिरा रोडची उजवी बाजु)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| १. | मे. सिधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रू. २२२५/- प्रती नग |
| २. | मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन | रू. २३४१/- प्रती नग |
| ३. | मे. मुकेश पोट्रीज एण्ड नर्सरी | रू. २२९०/- प्रती नग |

३) भाईंदर (पू) कनकिया, काशिगाव, घोडबंदर (फाटक ते काशिमिरा रोडची डावी बाजु)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| १. | मे. चंदना कंन्स्ट्रक्शन | रू. २२२५/- प्रती नग |
| २. | मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन | रू. २२५१/- प्रती नग |
| ३. | मे. सिधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रू. २२२७/- प्रती नग |
| ४. | मे. ओम कंन्स्ट्रक्शन | रू. २६२५/- प्रती नग |
| ५. | मे. देवी कंन्स्ट्रक्शन | रू. २३२५/- प्रती नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता क्र. १ मधील मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन रू. २२२२/- प्रती नग झाड, तक्ता क्र. २ मधील मे. सिंधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन रू. २२२५/- प्रती नग झाड, व तक्ता क्र. ३ मधील मे. चंदना कंन्स्ट्रक्शन रू. २२२५/- प्रती नग झाड यांचे निविदेतील दर सर्वात कमी असले तरी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात दि. ३०/०७/२००९ रोजी वाटाघाटी करिता बोलविले असता त्यांनी खालील प्रमाणे आपले दर कमी केलेले असुन तसे लेखी पत्र दिलेली आहेत.

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | कामाचे ठिकाण | दर |
|---|---|---|---|
| १. | मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन | भाईंदर (पश्चिम) व मुर्धा ते उत्तन विभाग | रू. २२२२/- प्रती नग |
| २. | मे. सिधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन | मिरारोड (पु.) पेणकरपाडा, मिरा गाव (फाटक ते काशीमिरा रोडची उजवी बाजु) | रू. २३५०/- प्रती नग |
| ३. | मे. चंदना कंन्स्ट्रक्शन | भाईंदर (पू) कनकिया, काशिगाव, घोडबंदर (फाटक ते काशिमिरा रोडची डावी बाजु) | रू. २२९०/- प्रती नग |

वरीलप्रमाणे तिन्ही कंपनीच्या (मे. गुरुजी कंन्स्ट्रक्शन, मे. सिंधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन व मे. चंदना कंन्स्ट्रक्शन) निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली असुन प्रत्येक ठेकेदारास प्रथम ५००० झाडे लावणेकामी कार्यादेश देण्यात येणार आहे. तरी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ठेका पद्धतीने वृक्षारोपण करणेकामी कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. स्थायी समिती सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, मी वृक्षप्राधिकरण समितीमध्ये असताना या विभागामध्ये एक सुचना मांडली होती की, जे ट्री गार्ड आहेत. त्याच्या निविदा मागवणार होते. त्यावेळेला त्याला स्थगिती दिली होती. त्याची वेगळी डिझाईन दिली होती. त्याचे फोटोग्राफ दिले होते. ट्री गार्डवर जाहिराती लावता येतात आणि आपण ते भाडे तत्वावर देउ शकतो. त्यातुन महापालिकेला उत्पन्न होईल. तशी सुचना मी त्यावेळेला मांडली होती. तर या ठरावामध्ये आपण ती सुचना घ्यावी. तो ठराव सुचनेसह मंजुर करावा.

**मा. आयुक्त :-**

ट्री गार्डचे डिझाईन आपण दिलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यावर जाहिराती....

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर जाहिरातीचे आपण वेगळे टेंडर काढू. त्याच्याशी निगडीत ठेवायचे नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ट्री गार्ड तशा पद्धतीशी निगडीत पाहिजेत ना.

**मा. आयुक्त :-**

डिझाईन तसे आहे.

**जुबेर इनामदार :-**

राउन्ड असेल तर लावता येत नाही. ट्रॅन्ग्युलर डिझाइनचे मी त्यांना फोटोग्राफ दिले होते. वृक्षप्राधिकरण समितीमध्ये दिले होते. श्री. प्रविण पाटील त्यावेळी आमच्या समितीमध्ये असताना दिले होते. त्याच्यावर जाहिराती फलक लावू शकतात.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ५२, सुचनेसह सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**मा. आयुक्त :-**

यामध्ये, आपल्याकडे एकूण ३३ गार्डन आहेत आणि १३ स्मशानभुमी आहेत. त्या स्मशानभुमी आणि गार्डन स्वखर्चाने मेन्टनन्स करायला लोक यायला लागले. म्हणून मी जाहिरात काढलेली आहे. म्हणजे गार्डनपण सुशोभीकरण करायचे आणि स्मशानभुमीपण आणि काही लोक मागायला लागले. तर आपण एकटाच आला आणि त्याला दिले. म्हणजे परत तक्रारी वाढायला नको म्हणून मी जाहिराती दिलेल्या आहेत. काही बिल्डर आणि काही सामाजिक संस्था यामध्ये येणार आहेत. त्यामधील आपल्या महापालिकेचे प्रत्येक गार्डनवरची ५-५ माणसे कमी होतील. आणि स्मशानभुमीवर आपण तीन पाळ्यांमध्ये ठेवतोच आहे. पण सुशोभिकरण करून ती व्यक्ती देईल. त्यासाठी पब्लीकेशन केलेले आहे आणि आपण काल गार्डनचे जे टेंडर मंजुर केले हाते, बगीचा विभागातील मजुरांचे, त्यामध्ये आपण फक्त ५० लोकांची ऑर्डर दिलेली आहे. कारण महापालिकेकडून १०० परमनंन्ट कर्मचारी होते. फक्त ५० कर्मचारी मागणी केली. त्यामुळे ते लोक माझ्याकडे आले होते. कारण मागच्या वेळेला एकूण २०७ कर्मचारी काम करत होते. २०७ पैकी ६० कर्मचारी सुपर विझन करित होत आणि १४७ लोक काम करत होते. १४७ भागीले ६० केले तर २.५ कामगरांवर एक सुपरवायझर होता. त्यामुळे मला एवढ्या कामगारांची जरूरी नाही. म्हणून ते कमी केलेले आहेत आणि एका गार्डनवर दोन माणसांची ड्युटी दुपारी ११-१२ वाजल्यापासुन रात्री ७ वाजेपर्यंतच लावलेली आहे. गार्डनवर एकच पाळी केलेली आहे. आणि स्मशानभुमीवर परमनन्ट कामगारांच्या तीन पाळी केलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

चौपाटीचे काय?

**मा. आयुक्त :-**

चौपाटीपण नेमलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

किती?

**मा. आयुक्त :-**

दोन माणसे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, दोन माणसांनी काय होणार आहे?

**मा. आयुक्त :-**

तिथे काय करायचे आहे? चौपाटीवर काय काम करायचे आहे?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही येउन बघा. पाणी मारायला त्या माणसांना अख्खा दिवस जाईल एवढा मोठा एरिया आहे.

**मा. आयुक्त :-**

दोन माणसे बस होतील.

**मिलन म्हात्रे :-**

तिकडे दहा नाहीत. आपले परमनंन्ट लोक सात वाजताच पळून जातात. ठेक्याची माणसे चांगली काम करतात.

**मा. आयुक्त :-**

ठेक्याची माणसे घ्यायला लागली म्हणून परमनन्ट माणसे कमी काम करायला लागली.

**मिलन म्हात्रे :-**

परमनन्ट माणसे कामच करत नाहीत. ठेक्याची माणसे तीनला जातात.

**मा. आयुक्त :-**

कारण परमनन्ट लोक असे म्हणतात की, तुम्ही टेम्पररी आहात. तुम्ही काम करा. आम्ही तुमचे काम बघतो. त्यामुळे मी टेम्पररी लोकांना कमी केले आणि परमनंन्ट लोकांवर जबाबदारी सोपवली.

**मिलन म्हात्रे :-**

पण ते पळून जातात ना.

**मा. आयुक्त :-**

पळून गेले तर आपण काढून टाकू ना.

**मिलन म्हात्रे :-**

आत्तापर्यंत किती काढले?

**मा. आयुक्त :-**

आत्तापर्यंत नाही. आत्ता सुरूवात केली आहे. काय केली ते मी तुमच्यापुढे सांगितले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ते कामाला होते. त्यांच्यावर आपले विभाग अधिकारी होते. मी म्हणत नाही किंवा १०० लोकांचे नाही किंवा ५० लोकांचे रिपोर्टींग नाही. दोन जणांचे तरी रिपोर्टींग केले का? आताच्या गार्डनमधील वस्तु चोरीला जातात. आपले सिक्युरिटी गार्ड नसतात. आपली माणसे नाहीत. परमनंन्ट माळी लोक येत नाहीत. तीन तीन दिवस गायब असतात.

**मा. आयुक्त :-**

मी आत्ता काय केले हे तुमच्यापुढे सांगितले काय फळ लागणार आहे ते पुढच्या मिटींगला बघा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही आल्यानंतर तीन महिन्यांनी मी बोलतो आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्या कर्मचाऱ्यांनी स्ट्राईक केलेला असेल ना?

**मा. आयुक्त :-**

स्ट्राईकचा काय संबंध आहे? त्यांच्याशी माझे काय कर्न्सन आहे. मी ठेकेदाराला देणार. ठेकेदाराने माणसे दिली नाहीत तर ठेका रद्द करणार.

**मिलन म्हात्रे :-**

मग परवा का अर्धा दिवस स्ट्राईक झाला?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही जी ५० लोक घेतले आहेत ते ५० लोकपण कामाला येत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

नाही आले तर त्यांना समजावून सांगितल तर तुमचा मुद्दा बरोबर आहे असे ते म्हणाले. ते गेले. त्यांचे समाधान झाले. मी त्यांची दोन तास मिटींग घेतली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे तुमचे असे म्हणणे आहे की, स्ट्राईक संपलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

माझ्याशी स्ट्राईकचे कनसर्न काय आहे? ते ज्यादा वाढवून द्या म्हणून मागायला आले मी देउ शकत नाही तुमच्याशी बोलण्याची इच्छापण नाही. माझा ठेकेदार आहे. परंतु तरीदेखील तुम्हाला समजाउन सांगतो.

**प्रकरण क्र. ५२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ठेका पध्दतीने वृक्षारोपण करणेकामी आलेल्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध तीन भागामध्ये ठेका पद्धतीमध्ये ठेका पद्धतीने वृक्षारोपण करणेकामी तीन वर्षाच्या निविदा मागविणेस मा. वृक्षप्राधिकरण समिती सभा ठराव क्र. २६ दि. ३०/०५/२००९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने दि. १५/०७/२००९ रोजी दै. नवभारत व जागरूक टाईम्स या वृत्तपत्रात (सार्वजनिक रस्त्यांच्या दुतर्फा महानगरपालिका निर्देश देईन त्या ठिकाणी दोन ते अडीच फुटाचे खड्डे खोदून लालमाती, शेणखत व अन्य खतांचे मिश्रण करून खड्ड्यामध्ये भरून त्यात

प्रथम किमान ५ ते ६ फुट उंचीची झाडे लावणे) झाडांचे संरक्षणार्थ लोखंडी जाळ्या मनपाने दिलेल्या नकाशाप्रमाणे लावणे व झाडांची तीन वर्षे देखभाल करून झाडे जगविणेकामी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. जाहिर निविदा सुचनेनुसार मिरा-भाईंदर हद्दीमध्ये ठेका पद्धतीने वृक्षरोपण करणेबाबत खालीलप्रमाणे ठेकेदाराने आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

१) भाईंदर (पश्चिम) व मुर्धा ते उत्तन विभाग

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| १. | मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन | रू. २२२२/- प्रती नग |
| २. | मे. कल्पतरू हॉस्पीलिटी एण्ड फॅसिलिटी | रू. २३५०/- प्रती नग |
| ३. | मे. सिधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रू. २२९०/- प्रती नग |

२) मरारोड (पु.) पेणकरपाडा, मिरा गाव (फाटक ते काशीमिरा रोडची उजवी बाजु)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| १. | मे. सिधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रू. २२२५/- प्रती नग |
| २. | मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन | रू. २३४१/- प्रती नग |
| ३. | मे. मुकेश पोट्रीज एण्ड नर्सरी | रू. २२९०/- प्रती नग |

३) भाईंदर (पू) कनकिया, काशिगाव, घोडबंदर (फाटक ते काशिमिरा रोडची डावी बाजु)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| १. | मे. चंदना कंन्स्ट्रक्शन | रू. २२२५/- प्रती नग |
| २. | मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन | रू. २२५१/- प्रती नग |
| ३. | मे. सिधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रू. २२२७/- प्रती नग |
| ४. | मे. ओम कंन्स्ट्रक्शन | रू. २६२५/- प्रती नग |
| ५. | मे. देवी कंन्स्ट्रक्शन | रू. २३२५/- प्रती नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता क्र. १ मधील मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन रू. २२२२/- प्रती नग झाड, तक्ता क्र. २ मधील मे. सिंधूदुर्ग कंन्स्ट्रक्शन रू. २२२५/- प्रती नग झाड, व तक्ता क्र. ३ मधील मे. चंदना कंन्स्ट्रक्शन रू. २२२५/- प्रती नग झाड यांचे निविदेतील दर सर्वात कमी असले तरी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात दि. ३०/०७/२००९ रोजी वाटाघाटी करिता बोलविले असता त्यांनी खालील प्रमाणे आपले दर कमी केलेले असुन तसे लेखी पत्र दिलेली आहेत.

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | कामाचे ठिकाण | दर |
|---|---|---|---|
| १. | मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन | भाईंदर (पश्चिम) व मुर्धा ते उत्तन विभाग | रू. २२२२/- प्रती नग |
| २. | मे. सिधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन | मिरारोड (पु.) पेणकरपाडा, मिरा गाव (फाटक ते काशीमिरा रोडची उजवी बाजु) | रू. २३५०/- प्रती नग |
| ३. | मे. चंदना कंन्स्ट्रक्शन | भाईंदर (पू) कनकिया, काशिगाव, घोडबंदर (फाटक ते काशिमिरा रोडची डावी बाजु) | रू. २२९०/- प्रती नग |

वरीलप्रमाणे तिन्ही कंपनीच्या (मे. गुरुजी कंन्स्ट्रक्शन, मे. सिंधुदुर्ग कंन्स्ट्रक्शन व मे. चंदना कंन्स्ट्रक्शन) निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली असुन प्रत्येक ठेकेदारास प्रथम ५००० झाडे लावणेकामी कार्यादेश देण्यात येणार आहे. तरी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ठेका पद्धतीने वृक्षारोपण करणेकामी कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. स्थायी समिती सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. टेरी परेरा** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी खालील सुचना मांडली.**

ट्री गार्डवर जाहिराती लावता येतात आणि आपण ते भाडे तत्वावर देउ शकतो. त्यातुन महापालिकेला उत्पन्न होईल.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५३, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील घरे, दुकाने व इतर मालमत्तांना नंबर प्लेट लावणेकामी खाजगी संस्थांकडून निविदा मागविणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ही कशी सिस्टम आहे? काय आहे? किती आकाराची नंबरप्लेट लावणार आहेत? कसे काय लावणार आहेत?

**मा. आयुक्त :-**

एक विनंती करायची राहिली. कोण विकासक गार्डन सुशोभिकरण करणारे किंवा मेन्टेन करणारे किंवा स्मशानभुमी करणारे पण असतील तर तेवढे बाकीच्यांनापण सांगावे अशी माझी विनंती आहे.

**अनिल सावंत :-**

ते काल मी पेपरला वाचले.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये त्यांचे काय? म्हणजे बी.ओ.टी. वर देणार आहात? बांधा, वापरा, पैशांची काही आकारणी वगैरे?

**मा. आयुक्त :-**

त्यांनी डेव्हलप करून आपल्या ताब्यात, आत्ता गार्डन आहे. गार्डन सुशोभिकरण केले. त्यांनी ॲडव्हर्टाइज लावावे आणि त्यांनी मेंटेन करावे आणि पब्लीकसाठी खुले ठेवावे.

**मिलन म्हात्रे :-**

ते मोफत ठेवणार आहात की, तिकीट देणार आहेत?

**मा. आयुक्त :-**

पब्लीकसाठी पुर्ण खुले. तिकीटाचा संबंध नाही. मेन्टेन करून त्यांनी त्यांचे ॲडव्हर्टाईज करावे.

**मिलन म्हात्रे :-**

कारण मागच्या वेळेच्या ॲग्रीमेंटचा त्रास अजुन आपण भोगतो आहे.

**मा. आयुक्त :-**

मी असे केलेले नाही. त्यानी त्यांच्या पद्धतीने आर्कीटेक्ट नेमुन गार्डन मेन्टेन करायचे आणि त्यांच्याच ताब्यात राहिल आणि त्यांना ॲडव्हटाईज फ्रि केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, त्याच्यामध्ये डिवायडरचा समावेश करावा. शहरामध्ये जेवढे डिवायडर आहेत किंवा छत्रपती मार्गाचे डिवायडर आहे. त्यांचा समावेश करा. त्याच्यावर क्योस लॉलीपॉपची परमिशन द्या.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पिछले २-३ साल से लोगो को डिवायडर दिए थे। लेकीन उसका अनुभव बहोत खराब है। लोग लेते है लेकीन कुछ करते नही। उसको गंदा करके चले जाते है।

**अनिल सावंत :-**

मिरा रोड मे करते है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

अपना जो मिरा भाईंदर रोड है, उसका महापालिका का अनुभव उसके बारे मे खराब है, ऐसा मुझे लग रहा है।

**अनिल सावंत :-**

मेन रोड का प्रॉब्लेम है।

**मा. आयुक्त :-**

लिया हुआ एक आदमी गलत हुआ तो वापस आनेवाली भी गलत होगे ऐसा नही है।

**जुबेर इनामदार :-**

साहेब, खाजगी संस्थांना, जाहिरात कंपन्यांना द्या.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

प्रकरण क्र. ५३ चा ठराव मंजुर आहे.

**जुबेर इनामदार :-**

त्यातुन त्यांना उत्पन्न झाले तर ते मेन्टेन करणार.

**अनिल सावंत :-**

५३ नंबर काय आहे? म्हणजे याच्यामागची आयडीया काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

५३ चे काय झाले.

**मदन उदितनारायण सिंह :-**

इसका खुलासा किजिए विषय क्या है? कैसा होगा?

**नगरसचिव :-**

विषय वाचण्यात आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कधी वाचला?

**नगरसचिव :-**

आता वाचला.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही ऐकला नाही.

**नगरसचिव :-**

दोन वेळा वाचला.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ५३ नंबरच्या विषयामध्ये मागच्या वेळेला आपण काही नंबर प्लेट दिलेल्या आहेत. आणि त्या अगदी निकृष्ट दर्जाच्या आहेत. पातळ आहेत, तुटतात. म्हणजे लावताना तुम्ही जेव्हा स्क्रु करणार तेव्हाच त्या तुटतात. माझ्या घरची नंबर प्लेट तुटलेली आहे. मी ठेवली आहे. तुटलेली नंबर प्लेट आणून दाखवतो.

**मा. आयुक्त :-**

केव्हा लावली होती.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला झाले ना. तुमचे विभागप्रमुख कोण आहेत? माझ्या घरी आहेत. मी नंबर प्लेट आणून देतो. यह चार साल पहले की बात है। साहेब, अगदी निकृष्ट दर्जाची आहे.

**मा. आयुक्त :-**

चार वर्षापुर्वी लावले होते.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी नाही सांगावे मी प्लेट आणून देतो. आमच्या जुन्या घरी आहे. गोविंद नगरची प्लेट तुम्हाला आणून देतो.

**मा. आयुक्त :-**

चार वर्षापुर्वी तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु चार वर्षापुर्वी गावात कुठेच लावलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, माझ्याकडे लावलेले आहे. मी तुम्हाला नंबरप्लेट आणून देतो. मिरा भाईंदर महापालिकेचे नाव आहे. ॲल्युमिनियमची प्लेट आहे. लाल अक्षरात नाव आहे. मी आणून देतो.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण मालमत्ता क्रमांक टाकणार आहोत? मागच्या वेळेला आपण एक सर्व्हे केलेला सी.टी.एस नंबर आपला होता, प्रत्येक घरांना देणार आहोत. मग सी.टी.एस. नंबर आल्यानंतर परत हा मालमत्ता क्रमांक बदलणार आहोत का?

**मा. आयुक्त :-**

प्रश्न असा आहे की, त्यावर सी.टी.एस. नंबरपण टाकायचा आणि घर नंबरपण टाकायचा. यामध्ये वॉर्डवाईज घरांना जे क्रमांक द्यायचे. म्हणजे कुठल्या घराची आकारणी राहिली, कुठल्या घराची राहिली नाही. आणि आत्ता एखादे टॉवर आहे आणि त्या टॉवरमध्ये ५४ फ्लॅट असतील, तर त्या टॉवरला १०१ नंबर आला. तर १०१ चा १, १०१ चा २, १०१ चा ३, १०१ चा ४ खाली ५४ नंबर आणि त्याचे जे ५४ फ्लॅटस् आहेत, त्या बिल्डींगला ५४ नंबर प्लेटस् लागतील. म्हणजे आपल्याला समजेल की, या टॉवरमध्ये २४ आहेत आणि यामध्ये महापालिकेने काही खर्च करायचे नाही. तो जो ठेका घेऊल, अजून टेंडर काढायचे आहे. ते दर स्टॅंडींग कमिटी मंजुर करेल. त्याप्रमाणे त्यांचे मजुर लावून ते नंबर प्लेट त्यांच्या चौकटीवर किंवा दारावर मारेल आणि त्यांच्याकडून तेवढेच पैसे घेउन जे दर आपण मंजुर करू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या नंबर प्लेटचे स्पेसिफीकेशन काय आहे?

**मा. आयुक्त :-**

टेंडर मंजुर करताना स्पेसिफिकेशन तुमच्यापुढे आणणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण साहेब, तुमची संकल्पना असेल ना.

**मा. आयुक्त :-**

संकल्पना म्हणजे अशी परिस्थीती झाली की, टोटल महापालिका हद्दीत किती घरे आहेत? फ्लॅट किती आहेत? किती प्रॉपर्टीचा कर येतो? किती प्रॉपर्टीचा येत नाही? प्रत्येक वेळेला, मागच्या वेळेला आपण २९ हजार प्रॉपर्टीची आकारणी केली. काही चौथ्या माळ्यावरचे दोन आकारणी केली, काही खालच्या माळ्यावरची एक आकारणी केली. मधले आकारणीच केलेले नव्हते. असे २९ हजार प्रॉपर्टीची एकाच वेळेला केली.

आत्तासुद्धा आपण दहा करोडची आकारणी केलेली आहे. तरी देखील हे नंबर प्लेटस् लावल्यानंतर कुठल्या नंबरच्या प्रॉपर्टीची आकारणी करायची राहिलेली आहे ते आपल्याला समजेल. पत्रव्यवहाराचा पत्तापण समजेल. आत्ता जे कम्प्युटर वरचे म्हणजे एवढे मोठे नंबर आाणि ते बघणेपण अवघड होऊन बसते. त्यामुळे सगळीकडे घर नंबर दिलेले आहेत आणि आपल्याकडे किती प्रॉपर्टी आहेत. म्हणजे आपण फ्लॅटपण स्वतंत्र मोजतो. स्वतंत्र मोजायचे नाही. एकच टॉवर मोजतो. स्वतंत्र मोजायचे नाही. एकच टॉवर मोजायला पाहिजे. पण त्यामध्ये १ ते ५४ फ्लॅटस् आहेत. १ ते ८४ फ्लॅटस् आहेत हे समजायला पाहिजे म्हणजे कशावर आकारणी झाली कशावर झाली नाही किंवा प्रॉपर्टी कुठे आहे हे समजावे म्हणून हे केलेले आहे. आपण मंजुरी दिल्यानंतर टेंडर मागवणार आहे त्यावेळेला नमुने दाखवायला आणणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, या विषयामध्ये एक अशी क्युरी राहिली आहे, महापालिका मंजुर निवीदा धारकाकडून नंबर प्लेटचा आकार व दर निश्चित करेल. आत्ता मी ठेकेदार आहे, मी तुम्हाला एवढा आकार देईन. साहेब, तुमची साईज पाहिजे. महापालिकेची साईज निविदाकार मंजुर करेल. शब्दरचना मला तशी वाटते.

**मा. आयुक्त :-**

साहेब आपण हे टेंडर पब्लीश करणार. आत्ता इथे स्टीलचे चालत नाहीत. कारण समुद्राच्या हवामानामुळे ते गंजतात.

**मिलन म्हात्रे :-**

स्टीलला काही फरक पडत नाही. उलट ॲल्युमिनिअम खराब होते.

**मा. आयुक्त :-**

स्टील किंवा ॲल्युमिनिअम.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी तुम्हाला ॲल्युमिनिअमची प्लेट आणून देतो. ती कास्टींग तुटते. त्यावेळी सुध्दा माझे असे सजेशन होते की, स्टीलच्या प्लेट ॲम्बोसींग करून दया.

**मा. आयुक्त :-**

मग आपण पब्लीस करताना स्टीलच्या प्लेट सांगू. आत्ता ठराव करताना ३२० चा म्हणून ठराव करा.

**मिलन म्हात्रे :-**

वन टाईम इनव्हेसमेंट आहे. बाकी काही नाही.

**जुबेर इनामदार :-**

एसएस-३०४, ३१० मॅग्नेटीक असतो गंजतो.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, याच्यामध्ये तुम्ही जे टेंडर काढणार आहात. ते ठेकेदाराने, जे निविदाधारक आहेत. त्यांच्याकडून पैसे घ्यायचे.

**मा. आयुक्त :-**

जे नंबर प्लेट आपण दर मंजुर करणार. ती यादी आपण ठेकेदाराला देणार. त्याप्रमाणे त्यांनी तिथे नंबरप्लेट लावायचे आणि त्या घरमालकाकडून पैसे घ्यायचे.

**अनिल सावंत :-**

मग साहेब, ही 'भिक्षा नको पण कुत्रं आवर' अशी हालत होईल. त्याच्यामध्ये तुम्ही एक प्रयोजन असे करा....

**मिलन म्हात्रे :-**

टॅक्समध्ये ॲड करा.

**अनिल सावंत :-**

तुम्ही टॅक्समध्ये ॲडकरा. कारण ते तुमचे कन्ट्रोल राहणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, उद्या असे होणार, तुम्ही १० रूपये द्याल. मै नंबर देता हूॅं, शंभर घेणार. ह्या तक्रारी...

**अनिल सावंत :-**

हे कंट्रोल राहणार नाही. तुम्ही काय दर निश्चित केला हे त्या फ्लॅटधारकांना माहिती नाही.

**मिलन म्हात्रे :-**

वाटल्यास तुम्ही एक शिक्का बनवा. आणि त्या टॅक्स पावतीमध्येच जे काही १०-१५ रूपये होतील ते ॲड करा. आणि त्याला बी.ओ.टी. वर द्या.

**अनिल सावंत :-**

त्यामध्ये काय अडचण आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये एकच अडचण आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

बहोत से लोग टॅक्स भरते ही नही है।

**अनिल सावंत :-**

ऐसा थोडे ही है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

बहोतसे प्रॉपर्टी मे टॅक्स लगा ही नही है।

**शानू गोहिल :-**

वह कितने दिन नही भरेंगे।

**मदन उदितनारायण सिंहः-**

हम रेट निश्तित करेंगे, वह रेट लोगो को बतायेंगे की, इसे ज्यादा नही देने का।

**अनिल सावंत :-**

बाजार वसुली का ठेका रेट निश्चित करके दिया है। आपने २५ रूपया नक्की किया। वो लोग ३०-३५ रूपया लेते है और पावती २५ रूपये की देते है।

**मिलन म्हात्रे :-**

आणि दिवसातून २-३ वेळा.

**अनिल सावंत :-**

जितने भी नक्की है। उसे १० - १५ रूपया ज्यादा ही लेते है।

**मिलन म्हात्रे :-**

दिवसातून दोन वेळा वसुली असते. सकाळी आणि संध्याकाळी

**अनिल सावंत :-**

त्याला लावू द्या.

**जुबेर इनामदार :-**

त्याने फिक्स करावे.

**मा. आयुक्त :-**

मग असे करु

**प्रकरण क्र. ५३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील घरे, दुकाने व इतर मालमत्तांना नंबर प्लेट लावणेकामी खाजगी संस्थांकडून निविदा मागविणेबाबत.

**ठराव क्र ४६ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवर मालमत्ता क्र. दर्शविणारे अल्युमिनीयम/ कास्टींगचे नंबर प्लेट लावणेकामी खाजगी संस्थांनी प्रशासनाशी तयारी दर्शविली आहे.

महानगरपालिका हद्दीत सन २००८-०९ पर्यंत एकूण मालमत्तांची संख्या ३५,५११ व खातेदारांची संख्या २,५२,५३९ इतकी असून सन २००९-१० या आर्थिक वर्षात मालमत्ता ४० हजार व खातेदार ३ लाख इतकी संभाव्य वाढ होणार आहे. विविध मालमत्तांना नंबर प्लेट लावल्यास पत्रव्यवहाराच्याकामी, रेशनकार्ड कामी, जनगणनेकामी, असेसमेंटकामी, निवडणुककामी, महानगरपालिकेच्या कर वसूलीच्या सोईच्या दृष्टीने मोलाची मदत होणार आहे. सदर कामी प्रत्येक मालमत्ताधारकांकडुन मंजूर संस्थेने त्यांचे मनुष्यबळ वापरुन मालमत्तेवर दर्शनी भागावर ठरवून दिलेल्या आकाराची ॲल्युमिनीयम/ कास्टींगची प्लेट लावावी असे ठरविणे इष्ट होईल. महानगरपालिका मंजूर निविदाकाराकडुन नंबर प्लेटचा आकार व दर निश्चित करेल, त्याप्रमाणे रितसर मालमत्ता धारकांनी त्यांचे कर पावती घेउन त्या संस्थेने ते शुल्क स्वतः वसूल करावे व ही अट ठरवुन त्या पद्धतीने निवीदा काढावी असे मत आहे. त्यामुळे कोणताही आर्थिक खर्चाचा भार महानगरपालिकेवर पडणार नाही.

तरी मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील घरे, दुकाने व इतर मालमत्ता यांना उपरोक्त प्रमाणे नंबर प्लेट लावणेकामी खाजगी संस्थांकडुन निविदा मागविणेस हि सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. अनिल दिवाकर सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५४ अवलोकन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एक सुचना अशी आहे की, अता मी म्हणालो त्या वेळेला गावठाणचा सर्व्हे झाला होता. आणि काही घरावर मालमत्ता नंबर लावले आहे. ते डिलीट करणार आहात का? त्या सोडुन लावणार आहात का? परत लावणार की, त्या सिरीअली नंबर प्रमाणे घेणार? माझ्या प्रभागात जो नंबर दिला तो नंबर नवीन याच्यात पण येणार का? कोणालाही माहिती नाही.

**मा. आयुक्त :-**

पुर्वी कोणाचे लावले असतील तर ते वगळणार आणि नवीन नंबर देणार.

**मिलन म्हात्रे :-**

काराण गावठणामध्ये सगळ्यांचे लागलेले आहेत. माझ्याकडे माझ्या घरचा लागला आहे मी तुम्हाला प्लेट आणून दाखवेन.

**मा. आयुक्त :-**

ते केव्हा लावलेले आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेचे आहेत. उस टाईम श्री. मोहन पाटील थे। उस टाईम ठराव मंजुर हुवा था। और प्लेट भी लगाया था। मेरे पास प्लेट पडा है। तुम्हारा जो गावठाण है, सब मे लगा हुआ है। और मेरे पास मेरे घर की प्लेट है। आज अभी एक घंटे के अंदर इनको लाकर दिखाता हु। आमच्या घरी ग्रामपंचायतीचा निराळा शिक्का आहे, तो अजुन आहे.

**मा. आयुक्त :-**

मागवून घेतो. परंतु नंबर वगळुन नवीन नंबर लावले जातील.

**प्रकरण क्र. ५४ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (वाचनालय) वाचनालयाकरीता ग्रंथबांधणी करणेबाबत.

**ठाराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वाचनालयाकरिता ग्रंथ बांधणी करणेकामी दि. ०६/०१/२००९ रोजी “ दै. सन्मित्र” व “दै. सागर” या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

वाटाघाटीनंतर जुन्या व नवीन ग्रंथांना बांधणी करणेकामी प्रती पुस्तक रु. २६/- दराने निविदा मंजुर करण्यात आलेली आहे.

सदरची सवलत ही एका वर्षाकरिता लागू राहिल व त्या सवलतीनुसार वेळोवेळी आवश्यक ग्रंथ बांधणी करून घेतले जातील. तरी सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार वरील प्रस्तावाचे अवलोकन करून मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

के खाली एक प्रस्ताव आलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापने वरील कायम स्वरुपी अधिकारी आणि कर्मचारी यांना मेडीक्लेम योजना लागू कारणे बाबत.

**मिलन म्हात्रे :-**

प्रस्ताव कोणी दिला आहे?

**नगरसचिव :-**

मा. आयुक्तांकडून आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, याच्यावर माझी सुचना अशी आहे, आपण मागच्या मिटींगला बोललात त्याबद्दल हे आणले पण तुम्ही हे जे १,२,३,४,५,६,७ दिलेले आहे. याच्यात गव्हर्नमेंटचे काही जी.आर आहेत. बाळंतपणावर किती खर्च करावा ? मी म्हणत नाही की, कुठल्या कर्मचा-याला कमी द्या. जर त्याच्यात ५५ हजार असेल तर आपण ५० देतो जर त्याच्यात १५ हजार असेल तर आपण ५० देतो. त्या जी.आर चे अवलोकन करुन त्या प्रत्येक बाबतीत जी.आर आहेत. त्या जी.आर नुसार या प्रस्तावावर तुमची कार्यवाही करावी अशी माझी स्वतःची या ठरावावर सुचना आहे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, हा जो प्रस्ताव तुम्ही दिलेला आहे त्यामध्ये कर्मचा-याने पॉलीसी दाखवल्या नंतर त्याला २७०० रुपये द्यायचे आहेत.

**मा. आयुक्त :-**

मागच्या वेळेला आम्ही जो ट्रायल केला २७०० रुपये दिले पण कोणीच इन्शुरन्स उतरवलेले आणले नाहीत.

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये ठराव आहे की, त्यांनी पॉलीसीची प्रत कार्यालयात सादर केल्यास त्यांना सुध्दा २७०० रुपये देण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

मागच्या स्टॅन्डींग कमिटीमध्ये असे झाले होते की, त्या कर्मचा-यांनी उतरवावे आणि त्यांनी सर्टीफीकेट आणून दाखवल्या नंतर त्यांचे तेवढे पैसे त्याला द्यायचे. परंतु त्यामध्ये नगण्य आहेत ४-५ लोकच आले. बाकीचे पैसे घेऊन गेले पण कोणी काढले नाहीत. महानगरपालिकेनेच उतरवायचे आहे आणि जे उतरवलेले देतील त्यांना पैसे द्यायचे.

**अनिल सावंत :-**

आपण काढले तर जास्त फायदा होईल.

**मा. आयुक्त :-**

आपणच काढणार ना?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, प्रकरण नंबर काय दिला आहे? ५४ क येणार का?

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५५ येईल.

**मिलन म्हात्रे :-**

शेवटचा विषय ५४ आला ना? मग ५४ के येणार.

**दिपक खाबीत :-**

के हा विषय नाही. के हा प्रकरण २ मधील अधिनियम आहे.

**मिलन म्हात्रे :-**

किती येणार, ५५? आणि याला ठराव काय येणार ?

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, ठराव वाचतो.

**मा. आयुक्त :-**

मंत्रालयातील सर्व लोकाचे म्हणणे आहे. मिरा भाईंदरने केले आणि वाढवून आणतात आणि तोच महाराष्ट्राला लागु होतो. परत-परत तुमचाच प्रस्ताव प्रत्येक वेळेला का येतो? मला ते विचारायला लागले.

**अनिल सावंत :-**

प्रकरण क्र. ५५, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कायम स्वरुपी अधिकारी / कर्मचारी यांना मेडीक्लेम योजना लागू करणे बाबत 'के' अन्वये प्रस्ताव. साहेब, याच्यामध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचारी नाहीत का?

**मा. आयुक्त :-**

सगळेच येणार.

**अनिल सावंत :-**

फक्त अधिकारी आणि कर्मचारी म्हटले आहे.

**मा. आयुक्त :-**

कर्मचारी आहे. त्याचेच महत्वाचे आहे. आता अग्नीशमनचे सर्वात महत्वाचे आहेत. त्याचा क्लेम वाढवायचा आहे.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम स्वरुपी कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना महापालिकेतर्फे प्रति वार्षिक रुपये २,७००/- वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत आली आहे. तथापी मोठया प्रमाणात उद्‌भवणा-या आजारांच्या व आकस्मित अपघात यामुळे होणा-या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वारंवार मागणी होत असते व महानगरपालिका निधीतून हा खर्च प्रदान केला जातो. या अनुषंगाने महापालिकेतील कायमस्वरुपी अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता मेडीक्लेम योजना घेतल्यास महापालिका खर्चात बचत होवून अधिकारी/कर्मचा-यांना मेडीक्लेम योजनेमध्ये जास्तीचा लाभ मिळू शकेल असे धोरण महानगरपालिकेचे असल्याने दि. २४/०७/२००८ रोजीच्या दैनिक नवभारत व दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात जाहिर प्रसिध्दी देवून शासकीय/निमशासकीय आणि शासन मान्य खाजगी राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय विमा कंपन्याकडून ग्रूप मेडीक्लेम योजनाबाबत ऑफर मागविण्यांत आली होती. विहीत मुदतीत बारा विमा कंपनी धारकांनी ऑफर सादर केली त्याची तुलना करता १२ ऑफर धारकांपैकी अ.क्र. ९ बोन्साय इन्शुरन्स प्रा.लि. यांची ऑफर वाजवी असून सर्वात किफायतशीर आहे. मे. बोन्साय इन्शुरन्स ब्रोकीम प्रा. लि. यांच्या

योजनेत १ अ ३ उ ४ (अधिकारी/कर्मचारी अ पत्नी अ मुले) सदस्यांची संख्या समाविष्ट आहे. प्रति कुटुंब वार्षिक खर्च रु.२,००,०००/- पर्यंत अनुज्ञेय असुन त्यासाठी अपेक्षित प्रिमियम (रुपये २,४४४/- बेस प्रिमियम अ रु.२५२/- सेवाकर) एकूण रुपये २,६९६/- आहे. अपेक्षित दवाखान्यांची यादी TPA दिलेली आहे. त्यात एकुण १२६ आजार डे-केअर प्रोसिजरसह समाविष्ठ आहेत. पॉलीसी घेण्यापुर्वी असलेल्या आजाराचा यात समावेश असुन उपचाराची पध्दत TPA प्रमाणे आहे. ग्रुप मेडिक्लेम पॉलिशी अंतर्गत उपरोक्त आरोग्य बाबी शिवाय इतर खालील बाबींचा समावेश आहे.

१. बाळंतपण खर्च रु. ५०,०००/- व नवजात बालकास जन्मापासून झालेल्या आजारपणाचा खर्च अनुज्ञेय आहे.
२. पॉलीशी घेतल्यानंतर ३० दिवसांत होणाऱ्या आजाराचा देखील समावेश आहे.
३. पॉलीसप्रमाणे १ % रुमभाडे व २ % आयसीयु रुमचार्ज मर्यादा.
४. दवाखान्यात ॲडमिट करण्यापुर्वी ३० दिवस व डिसचार्जनंतर ६० दिवस या कालावधीतील खर्च अनुज्ञेय आहे.
५. पुर्वी असलेल्या आजाराचा समावेश ग्राहय राहील.
६. १२६ आजार डे-केअर प्रोसिजरसह समाविष्ठ आहेत.

सदरची ऑफर युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.लि. मुंबई यांचे वतीने दि बोन्साय या प्रा. लि. कंपनीच्या वतीने ऑफर स्विकारुन कंपनीचे वतीने महानगरपालिकेशी करारनामा करुन पॉलीशी घेण्याची लेखी हमी सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि. मुंबई यांचे दि. ६/११/२००८ रोजी या कार्यालयास पत्र प्राप्त झालेले असुन युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि. यांनी मे. बोन्साय इन्शुरन्स प्रा. लि. कं. ही महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या मेडिक्लेम बाबत सेवा सुविधा तसेच कागदपत्राची पुर्तता करुन देण्याचे फक्त एक माध्यम असल्याचे कळविलेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना दि. १८/०४/२००६ रोजीच्या मा. महासभेने मान्यता दिल्यानुसार रु.२७००/- च्या मर्यादेत मेडिक्लेम योजना मे. बोन्साय इन्शुरन्स प्रा. लि. कंपनी चे माध्यमातुन युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि. मिरा भाईंदर महानगरपालिका अशा अटीशर्तीचा करारनामा (हमीपत्र) केल्यानंतरच रु. २७००/- चे मेडिक्लेम योजना अधिकारी/कर्मचारी व त्यांची दोन अपत्ये व कर्मचारी अविवाहीत असल्यास त्यांचे आई वडिल यांना लागु करणेस व ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी बाहेरुन वैयक्तीक कुटुंबाची मेडिक्लेम पॉलीसी घेतलेली आहे. त्यांनी पॉलीसीची प्रत कार्यालयात सादर केल्यास त्यांना सुद्धा रु. २७००/- देण्यात मंजुरी देण्यांत येत असुन सन २००९-१० या आर्थिक वर्षात मेडिक्लेम योजनेसाठी होणारा खर्च वेतन व भत्ते या स्थायी अस्थापना लेखाशिर्षातुन मागविण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच दि. ०७/०८/२००९ पर्यंत मा. राज्य सरकारकडून वेळोवेळी उपरोक्त प्रकरणी काढण्यात आलेले मार्गदर्शक तत्वे, सुचना, शासकीय पत्र, अर्ध शासकीय पत्र इत्यादीमध्ये घालण्यात आलेल्या निर्देशानुसार बांधील राहून वरील प्रकरणी मंजुरी देण्यात यावी. मा. आयुक्तांनी यापूर्वी अपूर्ण असलेली सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढावी.

**मिलन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे आणि एक सुचना सुध्दा आहे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, ही दोन लाखाचि पॉलीसी आहे. एकदम नॉमीनल अमाऊंट आहे. त्यामध्ये एखाद्या अधिकाऱ्याला समजा पाच लाखाची पॉलीसी काढायची असेल, कारण ती वेगळी काढली तर त्याच्यामध्ये तो वेगळी काढु शकत नाही ही दोन लाखाची काढुन आणखीन तीन लाखाची काढु शकत नाही. तर तो जो डिफरन्स आहे तो त्याच्याकडुन रिकवर करावा आणि महापालिकेतर्फे २७०० रुपये द्यावे असा तो करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, सुचना अशी आहे. प्रकरण क्र. ५५ वर दि. ०७/०८/२००९ पर्यंत मा. राज्य सरकाराकडुन वेळोवेळी उपरोक्त प्रकरणी काढण्यात आलेले मार्गदर्शन पत्र, सुचना, शासकीय पत्र, अर्धशासकीय तसेच इत्यादी मध्ये काढण्यात आलेल्या निर्देशानुसार बाधील राहुन वरील प्रकरणी मंजुरी देण्यात यावी, तसेच मा. आयुक्त यांनी यापुर्वी अपुर्ण असलेली वरील प्रकरणची सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढावी.

**मा. सभापती :-**

आपली खर्चवाढ चालली असल्या करणाने सर्व अधिकाऱ्यांचे मोबाईल फोन लागत नसल्याने मोबाईल फोन नंबर बंद करावे अशी मी सुचना करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मोबाईल फोन बंद करु नका.

**जुबेर इनामदार :-**

मोबाईल फोन बंद करु नका जे मोबाईल फोन बंद ठेवतात त्यांच्यावर कार्यवाही करा.

**मदन उदितनाराण सिंह :-**

मा. सभापती साहेब, कोई कॉन्टॅक्ट मे नही रहेगा कुछ फायदा नही है।

**मा. सभापती :-**

वह लोग खुदका नंबर देंगे।

**मदन उदितनाराण सिंह :-**

कोई मिलता नही है।

**अनिल सावंत :-**

या सुचनेला आमचा विरोध आहे.

**मदन उदितनाराण सिंह :-**

अगर ऐसा है तो बंद करने की मांग क्यो कर रहे है। चालु रहे।

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हा गंभीर विषय आहे. कारण आपल्याकडुन गेलेल्या अधिका-याकडे आपले मोबाईल नंबर अजुन तसेच आहेत. डी.एम.सी किंवा रिटायर झाले, गेले त्यांच्याकडे आणि आपण जर फोन प्रोव्हाईड करतो तर त्या अधिका-यांनी, इनकमिंग फ्री आहे तुम्ही घरी गेल्यानंतर साडेपाच-सहा नंतर बहुतेक सर्व महत्वाचे ऑफीसर लोकाचे फोन बंद असतात हा महापालिकेचा खर्च आहे त्यांनी तो इन्स्ट्रुमेंट चालु ठेवला पाहिजे, कोणाचेही नागरीकांचा जरी फोन आला तरी तो अटेड केला पाहिजे. कोण दुस-या गप्पा करित नसते त्याकरीता तुम्ही स्वतः याचा रिव्ह्यु घ्या. स्वतः फोन लावून बघा आणि ज्याचे लागत नसतील स्वीच ऑफ असतील त्याच्यावर कार्यवाही करा. बंद करायचे नाहीत.

**मा. आयुक्त :-**

त्यांचे फोन बंद केल्यानंतर त्याला चांगले होईल.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला स्वतःला कॉन्टॅक्ट करायचा आहे. हा फोन माझा स्वतःचा आहे ही माझी प्रॉपर्टी आहे. मी कधीही बंद ठेवीन कधीही चालु ठेवीन बिल भरले नाही तर बंद राहीले तर परत बील भरणारपण नाही का, तर तो फोन बंद रहावा सगळी सुव्यवस्था सुरळीत चालावी म्हणून हे फोन प्रोव्हाईड केलेले आहेत मग ह्याचे फोन का बंद असतात?

**मा. सभापती :-**

ते काय माणसे नाहीत.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब म्हणतात ते बरोबर आहे कारण ज्यावेळेला नागरीक भेटायला येतात त्यावेळेला बेलणे चालु असताना पन दहा फोन येतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, एक महत्वाचा विषय आहे साहेब, आपण आता जी वीमा योजना प्रत्येक कर्मचा-यांना देतो तर नवी मुंबई महानगरपालीकेने जे जेष्ठ नागरिक आहेत जे टॅक्स पेअर आहेत आणी ज्या विधवा आहेत त्यांनापण योजना लागू केली तर कसे होईल?

**मा. आयुक्त :-**

पुढच्या वेळेला ती एक योजना आणणार आहे प्रत्येक घराचे कुटुंबाचेपण इन्शुरन्स उतरावयाचे आहे. गावातील सगळ्या.

**जुबेर इनामदार :-**

महापालिकेचा मोबाईल चालू ठेवावा आणि त्यांच्या पर्सनल मोबाईलचा नंबरही लोकांना द्यावा ही माझी सुचना आहे.

**मा. आयुक्त :-**

चालु ठेवले नाही तर त्यांना निलंबीत करावे, माझी मंत्रालयात मिटींग चालू असताना फोन बंद असतात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही आदेश काढा की, २४ तास फोन चालू राहिले पाहीजे.

**ग्रिटा फॅरो :-**

मा. सभापती साहेब, तुमच्या परवानगीने बोलते, माझ्या वॉर्ड मध्ये ज्या निविदा निघालेल्या आहेत त्या मी माझ्या कामासाठी काढलेल्या आहेत. त्याच्यावर दुसरा नगरसेवक कोणीही जाऊन हक्क सागू शकतो का? तो ऑर्डर देऊ शकतो का? मला त्याचे उत्तर द्या की, ते कुठ पर्यंत योग्य आहे. मी निवीदा काढलेल्या आहेत. आपल्या ठेकेदाराला मा. महापौरानी बोलावून सांगीतले की, तीकडे काम करायला घे मी काम काढले आहे मी तिथे त्रास घेऊन निविदा काढल्या म्हणजे जे आहे ते प्रोसीजर कम्प्लीट केले. माझ्या कडे सर्व प्रुफ आहेत आणि ती व्यक्ती कशी सांगते की, हे टेंडर मी काढले आणि मी इथे मेहनत केलेली आहे. हे कुठपर्यंत योग्य आहे आणि याच्यावर मी काय करावे हे मला आपल्या कडुन उत्तर पाहिजे. ते नागरीक मला तेथुन फोन करतात की, मॅडम मा. महापौरानी इथे काम करायला सांगीतले आहे का? आम्हाला त्याचे काम नको आहे.

निवडणूकीला उभे राहायचे म्हणून आता धावतात तेव्हा ते जागरुक झाले नाहीत आता डोअर टु डोअर जातात.

**हेलन गोविंद :-**

मा. आयुक्त साहेब, अधिका-यांना सांगुन ठेवा कारण आम्ही सक्षम आहोत, आम्ही इथे कशासाठी येतो? आमच्या उथे चपला घासतात आम्ही येथे लोकांची कामे करतो आणि त्यांना श्रेय का द्यावे? दोन वर्षे त्यांनी काय केले? आता त्यांना आमदार बनायचे म्हणून सर्व ठिकाणी फिरायला हौस आली का? बहुतेक पदाधीकारी आता आमदार व्हायचे स्वप्न बधतात आणि त्यांनी तर संपुर्ण वॉर्ड मध्ये धुमाकुळ घातला आहे. आम्ही रात्रंदिवस इथे मेहनत करतो. माझ्या वॉर्डमध्ये सुध्दा तेच झालेले पाईप लाईनेचे मी संपुर्ण एस्टीमेट काढले संपुर्ण साईटवर नेवून तेथे दाखवले आणि श्री. वैती साहेबांनी आमच्या लोकांना सांगीतले की, मी तेथे टेंडर पास केले आणि कोमल भामरे यांनी तेथे जऊन नारळ फोडला. आम्ही लहान मुले टाकुन इथे कशासाठी येतो लोकांना आम्ही काम करतो ते माहिती आहे. आम्ही येथे एन.ओ.सी काढण्यासाठी किंवा प्रायवेट कामे करण्यासाठी येत नाही. लोकांची कामे कराण्यासाठी येतो. मा. आयुक्त साहेब, तुम्ही संपुर्ण अधिका-यांना सांगून ठेवा आम्ही पत्र व्यवहार करतो आमच्या पत्रांना इकडे उत्तरे का मिळत नाही ? आमची कामे का लेट झाली कारण मा. महापौराचे इथे राजकारण होते. त्यांना आमदारकीसाठी उभे राहायचे होते म्हणून त्यांनी आमची कामे केली नाहीत मग आम्ही येथे कशासाठी येतो ? आम्ही अधिका-याची बाजु पण घेतो अधिकारी चांगले आहेत त्यांच्यामुळेच तर आम्ही सहा वेळा निवडुन आलो आहोत पण मा. आयुक्त साहेब तुम्ही अधिका-यांना सांगुन ठेवा कोणीसुध्दा पदाधिका-यांनी दमदाटी केली तरी जो नगरसेवक पाठपुरावा करतो त्यांनाच श्रेय द्या.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या वॉर्डमध्ये सुध्दा असाच प्रकार आहे ह्यांच्या वॉर्डमध्ये मा. महापौर ढवळाढवळ करतात माझ्या वॉर्डमध्ये दोघेही ढवळाढवळ करतात. माझ्या वॉर्डमध्ये श्री. अशोक तिवारी येऊन दर वेळेला ठेकेदारांना दमदाटी करायच्या, ही कामे अशी झाली पाहीजे हे गेल्या दोन वर्षापासुन मी झेलतो आहे मला एक सांगा एखादे काम होत असताना कुठल्याही ठिकाणी काम करताना आम्ही महाराष्ट्रभर फिरतो बाजुच्या तालुक्यात जा तिकडे श्री. हितेश ठाकुर यांचे बोर्ड लागलेले असतात. मा. आमदार यांच्या प्रयत्नातुन अमुक - अमुक काम झाले कामाची वर्क ऑर्डरची तारीख पुर्ण व्हायची वेळ, अमुक-तमुक सगळे लिहलेले असतेहि पध्दत आहे, आमच्या इकडे सुध्दा असाच त्रास आहे. आम्ही पाण्याखाली गेलेल्या झोपड्या बघायला गेलो ते प्रभाग अधिकारी श्री. परब, श्री. पानपट्टे. एस.आय. श्री. पवार बरोबर होते. लोकांची घरे बुडायला आली आम्ही लोकांना बाहेर काढतो अशोक तिवारी जिंदाबाद — मुर्दाबाद आणि मारामारी भांडणे लावायचे धंदे लोकांची मरणाची पाळी आलेली त्यावेळी त्यांची मिसेस नगरसेविका त्या स्वतः माझ्या वॉर्डमध्ये बरोबर होत्या त्याला वेसन कसे घालायचे ते मला माहित आहे. मी बरोबर घालीन याच्यामध्ये प्रशासनाने सुध्दा लक्ष द्यायला पाहीजे. मी मा. स्थायी समितीचा सदस्य आहे. हे सगळे १६ सदस्य मिरा भाईंदर मध्ये सगळीकडे फिरु शकतात कायदा तो आहे. नगरसेवकालाही बंधन नसावे मग तुम्ही ज्या वेळेला एका ठिकणी सांगता की, अमुक -अमुक झाले आहे ही कामे आमच्या वतीने होत आहेत याचा अर्थ असा होतो की, तो नगरसेवक निष्क्रीय आहे आणि आम्ही फार सक्रीय आहोत ठेकेदाराने बांधकामाचे काम सुरु केले त्यांच्या लोकांनी सगळे काम थांबवले आणि मग तक्रारी करायला लागले कोणाला तक्रार करायची असेल तर त्यांनी मा. आयुक्तांकडे तक्रार करावी की, इकडे पाईपलाईन बरोबर लावलेली नाही सिमेंट कमी पडते, अमुक होते लेखी तक्रार करा हे उद्योग जेव्हा होतात तेव्हा आपले जे.ई कुढे असतात? त्यांचे लक्ष ही नसते तिकडे भांडणे लागतात.

**अनिल सावंत :-**

मागच्या वेळेला मा. महासभेमध्ये विषय आला तेव्हा मा. महापौरांनी सांगीतले की, कुढल्याही वॉर्ड मध्ये मी जाणार नाही आणि जायचे असले त्यावेळी स्थानिक नगरसेवकांना घेऊन जाईन. तुमच्या समक्ष सांगीतले होते आता त्यांचे मोड ऑफ कशी आहे माहिती आहे, ते अधिका-यांना विचारतात की, कुढच्या विभागात कधी काम सुरु होणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या दिवशी आग लागली तर श्री. अशोक तिवारी यांनी बंब थांबवला. फायर ऑफिसर आहेत त्यांना विचारा. तिकडे फायर ब्रिगेडचा बंब नेउ नका म्हणून. त्यांना फोन आला की नाही हे विचारा. हा इंटरफेअरन्स आहे ना. आज इमरजन्सी गाडी थांबवतात. गाडी पंधरा मिनिटे तिकडे थांबली ह्यांना त्यानी रिकॉल करून विचारले की, असे झाले आहे. गाडी जाउ नका म्हणून सांगतात. आज तिकडची पंधरा मिनिटे फुकट गेली ना? साहेब मी हे उद्योग करणार नाही. पहिले आग विझली पाहिजे पण हे उद्योग सुरू झाले आहेत.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, तुमच्या अधिका-यांनी सांगितले नाही तर ठेकेदाराला विचारतात की, काम कधी सुरू करणार आहे? त्यानंतर ते वॉर्डमध्ये जातात. आपकी क्या समस्या है बताईए। ते बोलतात की, गटर का है हे म्हणतात दो दिन मे काम चालू हो जाएगा। नंतर हे ठेकेदाराला सांगतात की, काम चालू करा. तुमचे

जे.ई. त्याठिकाणी असतात. मा. महापौर जाउन नारळ फोडतात. हे सर्व ठिकाणी चाललेले आहे. १४५ मतदार संघामध्ये.....

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचे नाही. बाकीच्या पक्षाचेपण चालले आहे.

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये जो स्थानिक नगरसेवक निवडून आलेला आहे. लोकप्रतिनिधी आहे. त्याच्यासाठी काम करतो. हे मा. महापौर दोन वर्षे होते कुठे?

**मिलन म्हात्रे :-**

याच्या अगोदर पाच वर्षे नगरसेवक होते. शहराकरिता काय केले ते सांगावे. लेखाजोखा आत्ता येईलच. इलेक्शन लागतेच आहे. पंचनामा होणारच आहेत.

**मा. सभापती :-**

आपल्या सर्व नगरसेवकांनी आपले आपले काम करावे. आपले आपले जाहिर फलक लावावेत. बॅनर लावावेत. आपण आपल्या वॉर्डमध्ये काय काम करता हे दाखवावे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुमच्या अपरोक्ष तुमच्या वॉर्डमध्ये उद्या मी इंटरफेअर केले आणि तुम्हाला न सांगता एखाद्या कामाचे धुमधडाक्याने उद्घाटन केले. तर तुम्हाला कसे वाटेल? तुम्ही सगळ्या अधिका-यांना शिवीगाळ कराल.

**मा. सभापती :-**

तुम्ही आमच्या वॉर्डला उल्टेपाल्टे कामे करत नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही कधीच करत नाही. दाखवून द्यावे.

**मा. सभापती :-**

गणेश देवलला अजुनपर्यंत समाजमंदिर झालेच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही कधीच खोंडा टाकला नाही. कोणी पत्र दिले असेल ते दाखवावे. आम्ही समाजमंदिरे बनवली. श्री. मोहन पाटील यांनी विरोध केला. समाजमंदिर नाही आरोग्य केंद्र सुद्धा बनवायचे नाही. मिटींगमध्ये प्रोसीडींग आहे. आम्ही कुठे खोंडा घातलेला नाही. पत्र असेल तर तुम्ही दाखवा. हवेत गोष्टी करायच्या नाहीत. पुरावे दाखवा आणि मग बोला. नाहीतर मी पुरावे दाखवतो. प्रोसिडींग काढा आणि बघा त्यामध्ये श्री. मोहन पाटील यांनी विरोध केले आहेत की, झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्य सुविधा पुरवायच्या नाहीत.

**मा. आयुक्त :-**

विभागप्रमुखांनी कोणाची कामे केव्हा मंजुर झालेली आहेत, केव्हा काम सुरू होणार आहे हे फक्त नगरसेवकांना सांगावे आणि नगरसेवकांना विश्वासात घेउनच कामाची सुरूवात करावी. नगरसेवकांना सोडून इतर कोणालाही सांगू नये. आणि टेंडर केव्हा मंजुर झाले, काम केव्हा सुरू होणार आहे हे कुठल्याच नागरिकाला किंवा कुठल्याही दुस-या नगरसेवकाला सांगू नये. त्या वॉर्डमधील नगरसेवकांना सांगावे आणि त्यांना घेउनच कामाची सुरूवात करावी. आणि तसे त्यांना पत्र द्यावे की, तुमच्या प्रयत्नाने हे काम मंजुर झालेले आहे. तर तुमच्या कामाची सरूवात या तारखेला करतो. त्यांच्या रेकॉर्डला ते पत्र द्यावे. त्या पत्राचे प्रसिद्धीकरण तुम्ही नागरिकांना दाखवा.

**मिलन म्हात्रे :-**

आणि हे न केल्यास किंवा अधिका-यांचा, दलालांचा इन्फॉर्मेशनचा सहभाग आढळून आल्यास आम्ही रूम तोडायला तक्रारी केल्या, त्या दिवशी श्री. पानपट्टे साहेब होते, नागरिक माझ्या अंगावर आले. त्या झोपड्या सगळ्या खाडीत बांधल्या आहेत. आपले इन्फॉर्मर आपले वॉर्ड ऑफिसर वगैरे सगळे आहेत. आपले अधिकारी टीप देतात की, या माणसाने इकडे तक्रारी दिल्या आहेत. त्याच्याबद्दल काय? वॉर्ड ऑफिसर धडधडीत सांगून येतो की, या माणसाने इतक्या तारखेला, त्या पत्राची झेरॉक्सपण त्याच्याकडे असते. तुमच्या ऑफिसचा इनवर्डचा चौरस शिक्का असतो त्याच्या झेरॉक्स नागरिकांपर्यंत पोहोचतात. उद्या एखाद्या प्रकरणात एखाद्या नगरसेवकाचा जीव गेला. तपासामध्ये सगळे येणार नाही का? हल्ले झाले आहे. नगरसेवकांना घरात जाउन गोळ्या घालून लोकांनी ठार मारले आहेत.

**प्रकरण क्र. ५५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कायमस्वरूपी अधिकारी / कर्मचारी यांना मेडीक्लेम योजना लागू करणेबाबत.

**ठराव क्र. ४८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम स्वरूपी कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना महापालिकेतर्फे प्रति वार्षिक रूपये २,७००/- वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत आली आहे. तथापी मोठया प्रमाणात उद्भवणा-या आजारांच्या व आकस्मित अपघात यामुळे होणा-या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वारंवार मागणी होत असते व महानगरपालिका निधीतून हा खर्च प्रदान केला

जातो. या अनुषंगाने महापालिकेतील कायमस्वरुपी अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता मेडीक्लेम योजना घेतल्यास महापालिका खर्चात बचत होवून अधिकारी/कर्मचाऱ्यांना मेडीक्लेम योजनेमध्ये जास्तीचा लाभ मिळू शकेल असे धोरण महानगरपालिकेचे असल्याने दि. २४/०७/२००८ रोजीच्या दैनिक नवभारत व दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात जाहिर प्रसिध्दी देवून शासकीय/निमशासकीय आणि शासन मान्य खाजगी राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय विमा कंपन्याकडून ग्रूप मेडीक्लेम योजनाबाबत ऑफर मागविण्यांत आली होती. विहीत मुदतीत बारा विमा कंपनी धारकांनी ऑफर सादर केली त्याची तुलना करता १२ ऑफर धारकांपैकी अ.क्र. ९ बोन्साय इन्शुरन्स प्रा.लि. यांची ऑफर वाजवी असून सर्वात किफायतशीर आहे. मे. बोन्साय इन्शुरन्स ब्रोकीम प्रा. लि. यांच्या योजनेत १ अ ३ उ ४ (अधिकारी/कर्मचारी अ पत्नी अ मुले) सदस्यांची संख्या समाविष्ट आहे. प्रति कुटुंब वार्षिक खर्च रु.२,००,०००/- पर्यंत अनुज्ञेय असुन त्यासाठी अपेक्षित प्रिमियम (रुपये २,४४४/- बेस प्रिमियम अ रु.२५२/- सेवाकर) एकूण रुपये २,६९६/- आहे. अपेक्षित दवाखान्यांची यादी TPA दिलेली आहे. त्यात एकुण १२६ आजार डे-केअर प्रोसिजरसह समाविष्ठ आहेत. पॉलीसी घेण्यापुर्वी असलेल्या आजाराचा यात समावेश असुन उपचाराची पध्दत TPA प्रमाणे आहे. ग्रुप मेडिक्लेम पॉलिशी अंतर्गत उपरोक्त आरोग्य बाबी शिवाय इतर खालील बाबींचा समावेश आहे.

१. बाळंतपण खर्च रु. ५०,०००/- व नवजात बालकास जन्मापासून झालेल्या आजारपणाचा खर्च अनुज्ञेय आहे.
२. पॉलीशी घेतल्यानंतर ३० दिवसांत होणाऱ्या आजाराचा देखील समावेश आहे.
३. पॉलीसप्रमाणे १ % रुमभाडे व २ % आयसीयु रुमचार्ज मर्यादा.
४. दवाखान्यात ॲडमिट करण्यापुर्वी ३० दिवस व डिसचार्जनंतर ६० दिवस या कालावधीतील खर्च अनुज्ञेय आहे.
५. पुर्वी असलेल्या आजाराचा समावेश ग्राहय राहील.
६. १२६ आजार डे-केअर प्रोसिजरसह समाविष्ठ आहेत.

सदरची ऑफर युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.लि. मुंबई यांचे वतीने दि बोन्साय या प्रा. लि. कंपनीच्या वतीने ऑफर स्विकारुन कंपनीचे वतीने महानगरपालिकेशी करारनामा करुन पॉलीशी घेण्याची लेखी हमी सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि. मुंबई यांचे दि. ६/११/२००८ रोजी या कार्यालयास पत्र प्राप्त झालेले असुन युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि. यांनी मे. बोन्साय इन्शुरन्स प्रा. लि. कं. ही महानगरपालिका कर्मचाऱ्याच्या मेडिक्लेम बाबत सेवा सुविधा तसेच कागदपत्राची पुर्तता करुन देण्याचे फक्त एक माध्यम असल्याचे कळविलेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना दि. १८/०४/२००६ रोजीच्या मा. महासभेने मान्यता दिल्यानुसार रु.२७००/- च्या मर्यादेत मेडिक्लेम योजना मे. बोन्साय इन्शुरन्स प्रा. लि. कंपनी चे माध्यमातुन युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि. मिरा भाईंदर महानगरपालिका अशा अटीशर्तीचा करारनामा (हमीपत्र) केल्यानंतरच रु. २७००/- चे मेडिक्लेम योजना अधिकारी/कर्मचारी व त्यांची दोन अपत्ये व कर्मचारी अविवाहीत असल्यास त्यांचे आई वडिल यांना लागु करणेस व ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी बाहेरुन वैयक्तीक कुटुंबाची मेडिक्लेम पॉलीसी घेतलेली आहे. त्यांनी पॉलीसीची प्रत कार्यालयात सादर केल्यास त्यांना सुद्धा रु. २७००/- देण्यात मंजुरी देण्यांत येत असुन सन २००९-१० या आर्थिक वर्षात मेडिक्लेम योजनेसाठी होणारा खर्च वेतन व भत्ते या स्थायी अस्थापना लेखाशिर्षातुन मागविण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच दि. ०७/०८/२००९ पर्यंत मा. राज्य सरकारकडून वेळोवेळी उपरोक्त प्रकरणी काढण्यात आलेले मार्गदर्शक तत्वे, सुचना, शासकीय पत्र, अर्ध शासकीय पत्र इत्यादीमध्ये घालण्यात आलेल्या निर्देशानुसार बांधील राहून वरील प्रकरणी मंजुरी देण्यात यावी. मा. आयुक्तांनी यापूर्वी अपूर्ण असलेली सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढावी.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदन :- श्री. मिलन वसंत म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्वांचे आभार मानून सभा संपली असे मी जाहिर कतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**